| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १२० वा | शुक्रवार दिनांक १७ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## येडशी-टेंभुर्णी चौपदरीकरणाला तीन महिन्यांत मंजुरी, त्यानंतर तातडीने निविदा प्रक्रिया; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही-आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (प्रतिनिधी)- येडशी-बार्शी-कुर्डुवाडी-टेंभुर्णी या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवालास (उझ्ठ) पुढील तीन महिन्यांत मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर तातडीने निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी क्षगडकरी यांनी दिली असल्याची माहिती आमदार तथा मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांची बुधवारी भेट घेऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील व आमदार राजाभाऊ राऊत यांनी येडशी-बार्शी-कुर्डुवाडी-टेंभुर्णी या मार्गाच्या चौपदरीकरणासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. या मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) तातडीने मंजुरी देऊन प्रशासकीय मान्यता द्यावी, आवश्यक निधी उपलब्ध करून कामाला लवकर प्रारंभ करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. धाराशिव जिल्हा हा मराठवाड्याचे प्रवेशद्वार असून तुळजाभवानी मंदिरामुळे राज्यातील प्रमुख धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखला जातो. तसेच जिल्ह्याची आकांक्षित जिल्हा म्हणूनही निवड झाल्यानंतर विविध विकास प्रकल्पांना गती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर दळणवळणाची सक्षम व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व राजाभाऊ राऊत यांनी या निवेदनात नमूद केले.

टेंभुर्णी-लातूर हा मार्ग पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कर्नाटकला जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. टेंभुर्णी, कुर्डुवाडी, बार्शी, धाराशिव आणि लातूर या शहरांमधील वाढती वाहतूक, कृषी व औद्योगिक विकास लक्षात घेता या मार्गाचे चौपदरीकरण अत्यावश्यक बनले आहे. येडशी-लातूर या टप्प्याचे काम सुरू असले तरी टेंभुर्णी ते येडशी या उर्वरित भागाचेही तातडीने चौपदरीकरण करण्याची गरज असल्याचे आमदार पाटील व राजाभाऊ राऊत यांनी निदर्शनास आणून दिले. यावेळी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी एनएच-५४८-सी अंतर्गत टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-कुसळंब तसेच एनएच-६३ अंतर्गत कुसळंब-येडशी या मार्गाच्या चौपदरीकरणासाठीचा DPR पुढील तीन महिन्यांत मंजूर करण्यात येईल. त्यानंतर त्वरित निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही दिली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व राजाभाऊ राऊत यांनी सांगितले आहे.

व्यापार, उद्योग, शेतीसह धार्मिक पर्यटनालाही चालना मिळणार : आमदार राणाजगजितसिंह पाटील

या महामार्गावरील प्रमुख गाव असलेल्या येडशी येथे 'वन टाइम इम्प्रूव्हमेंट' (जपश ढळाश थीइ) योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते, नाली, स्ट्रीट लाईट आदी मूलभूत सुविधा विकसित करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. येडशी येथील ही विकासकामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित रस्ते राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे धाराशिव, सोलापूर आणि लातूर जिल्ह्यांतील नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून, व्यापार, उद्योग, शेती, धार्मिक पर्यटन आणि एकूणच प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भाग्यश्री अनिल कुलकर्णी, वय ४१ वर्षे, रा.सारागौरव मागील स्वास्तीक प्राईम कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचे गेट उघडून दरवाजाची लॉकपट्टी अज्ञात व्यक्तीने दि. १२.०७.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३०,००० असा एकुण ५०,००० माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भाग्यश्री कुलकर्णी यांनी दि.१५.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे

### सोन्याचे दागिणे,गुंड्या, दोन साकळ्या व रोख रकमेची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सचिन सिद्राम कुलकर्णी, वय २७ वर्षे, रा.कोथळी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१५.०७.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, दोन गुंड्या व दोन साकळ्या व रोख रक्कम १०,००० असा एकुण १९,००० माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सिद्राम कुलकर्णी यांनी दि.१५.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(ए), ६२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कालवडची झाली चोरी: गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गोरख बलभिम भराटे, वय ४३ वर्षे, रा. पारा ता. वाशी जि. धाराशिव यांची अंदाजे १०,००० किंमतीची कालवड व नरहरी लिंबाजी ढेंगळे यांची अंदाजे ८,००० किंमतीची कालवड असा एकुण १८,०००किंमतीच्या दोन कालवडी या दि.१४.०७.२०२६ रोजी ०३.३० ते ०४.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने पारा शिवारातील शेतातुन चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गोरख भराटे यांनी दि.१५.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लैंगीक अत्याचार

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ३१ वर्षीय महिला सन२०१५ पासुन दि. १४.७.२०२६ हिस गावातील एका तरुणानी लग्नाचे अमिष दाखवून तिस लॉजवर नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१५.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-११५(२), ६४(१),६४(२) (एम), ६९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## खुनाच्या गुन्ह्यातील तीघेजन गजाआड

### धाराशिव ग्रामीण व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १३ रोजी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील कुमाळवाडी शिवारात एक पुरुष जातीचे प्रेत पडलेले आहे आशी फोन द्वारे माहिती मिळाल्याने धाराशिव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सपोनि हाके, पोलीस उपनिरीक्षक संदीप ओव्हाळ व स्टाफ घटनास्थळी रवाना झाले. मौजे कुमाळवाडी शिवारातील सदर घटनास्थळी एक ४० ते ४५ वर्ष वयोगटातील पुरुष जातीचे प्रेत रक्ताच्या थारोळ्यात मयत अवस्थेत पडलेले दिसले. यावरून सदर ईसमाचा कोणीतरी खुन केला असल्याचे स्पष्टपणे दिसून येत होते. सदर ठिकाणी घटनास्थळाचे बाजूला एक हिरो होन्डा स्पलेंडर मोटार सायकल उभी होती. सदर मोटार सायकलच्या मालकाचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर काढुन मयताची ओळख पटवली. मयताचे नाव दगडू देशमुख राहणार येडशी असे असल्याचे समजले.

सदरची माहिती पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खरोखर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राउत यांना लागलीच देऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील तपास चालु केला.दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी राऊत व स्थानिक गुन्हेचे पोलीस निरीक्षक विनोद ईज्जपवार व पथक सुद्धा घटनास्थळी आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन आणि सूचनांप्रमाणे संशयित आरोपींचा शोध सुरू केला. तपासामध्ये संशयीत व मयताची पत्नी यांचे अनैतिक प्रेम संबंध असल्याची माहिती मिळाली, त्यावरुन आम्ही संशयीत व्यक्ती बालाजी वय ३५ वर्षे रा. सातनाक वस्ती, पांगरी ता. बार्शी जि. सोलापुर याचा शोध घेतला असता तो त्याच्या मेहुण्यासोबत पुणे येथे गेला असल्याचे समजले. पुणे पोलिसांच्या मदतीने नमुद संशयित बालाजीचा शोध घेतला असता तो त्याचा दुसरा साथीदार सोमनाथ याच्यासोबत मिळून आला.

सदरचा खून मयताच्या पत्नीच्या सांगण्यावरून बालाजी व सोमनाथ या दोघांनी चाकूने वार करून व दगडाने ठेचून केला असल्याचे सांगितले. बालाज , सोमनाथ व मयताची पत्नी यांना नमूद गुन्ह्यात अटक केली असून पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे अधिक तपास करत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खरोखर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राउत यांचे मार्गदर्शनाखाली धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, ग्रामीण पोलीस स्टेशनचे सपोनि हाके, पोलीस उपनिरीक्षक संदीप ओव्हाळ, पोलीस हवालदार माचेवाड, खोसे, गादेकर, ढगारे, घुगे, पोलीस नाईक सावंत, पोलीस शिपाई पडवळ, आरसेवाड, स्वामी, गवळी, बनाळे, महिला पोलीस हवालदार बांगर, सोन्ने करीत आहेत.

## आलियाबाद येथे तेलंगणा राज्याचे विधानसभा उपाध्यक्ष डॉ रामचंद्र नायक यांनी सदिच्छा भेट



तुळजापूर(विजय पिसे)- तालुक्यातील जळकोट जवळ असलेल्या आलियाबाद येथे तेलंगणा राज्याचे विधानसभा उपाध्यक्ष डॉक्टर रामचंद्र नाईक यांनी सदिच्छा भेट दिली व

गावअतंर्गत विकास कामांची पाहणी करून माहिती घेतली तसेच वाचनालयाला भेट देऊन एकंदरीत विकासात्मक कामाबाबत समाधान व्यक्त केले.यावेळी आलियाबाद ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सहपत्निक भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश चव्हाण, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण, हनुमंत नायक,नंदू तेजावत , डॉ.रमेश लोकावत, डॉ.गिरीधर,ओएसडी भगवान नायक,प्रमिला नायक, ज्योतीका चव्हाण, सुभाष नाईक, विनायक चव्हाण, पांडुरंग चव्हाण, शिवाजी चव्हाण, माणिक राठोड, महादेव राठोड, सिद्राम पवार, यशवंत राठोड, सुभाष चव्हाण, सुभाष राठोड, तानाजी राठोड, ग्रामपंचायत सदस्य कुमार राठोड, अमोल चव्हाण, सुनील चव्हाण, यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक प्राचार्य संतोष चव्हाण यांनी केले तर आभार गणेश चव्हाण यांनी मानले.

## संत गजानन महाराज पालखी आगमनानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसकडून भव्य रक्तदान शिबिर; रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-धाराशिव शहरात श्री संत गजानन महाराज यांच्या पालखी आगमनाचे औचित्य साधत सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार), धाराशिव शहरच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला युवक, नागरिक व रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

समाजातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, तसेच रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात अनेक युवकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवत रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव दाखवून दिली. उपस्थित मान्यवरांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगत नागरिकांनी नियमित रक्तदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष शेखर (भैय्या) घोडके, नगरसेवक तथा शहराध्यक्ष आयाज (बबलू भाई) शेख, नगरसेवक पंकज (नाना) भोसले, एजाजभाई काझी, शहर कार्याध्यक्ष नरसिंहभैय्या मेटकरी, रोहित भैय्या बागल, शहर संघटक कुणाल कर्णवर, मिलिंद आप्पा पेठे, अजिंक्य हिबारे, दराडे सर, अर्चना ताई अंबुरे, ज्योतीताई माळाळे, रणवीर बर्डे, ओंकार गपाट यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांचे आभार मानत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेची परंपरा अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पखरुडमध्ये नैसर्गिक शेतीची शाळा; विषमुक्तीचे धडे

ईट(प्रतिनिधी)- भूम तालुक्यातील पखरुड येथे राज्य शासनाच्या नैसर्गिक शेती अभियानांतर्गत आयोजित शेती शाळेच्या दुसऱ्या वर्गाला महिला व पुरुष शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरणपूरक, विषमुक्त आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविणे, शेतीवरील उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादन क्षमतेत वाढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. या वर्गात पेरणीनंतर पिकांचे निरीक्षण, नैसर्गिक पद्धतीने पीक संरक्षण, दशपर्णी अर्क व निंबोळी अर्काच्या फवारणीचे महत्त्व तसेच जीवामृताच्या प्रभावी वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांसमोर जीवामृत तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. कृषी सखी प्रियंका चव्हाण आणि सारिका चव्हाण यांनी जीवामृत तयार करण्याची प्रक्रिया समजावून सांगत त्याचे शेतीतील महत्त्व स्पष्ट केले. आत्मा विभागाचे भूम तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक धीरज शिंदे आणि वाशी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक अजित जिंतपूरे यांनी नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रज्ञान, सेंद्रिय निविष्ठांचा वापर आणि पिकांचे नैसर्गिक व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. खरीप हंगाम संपेपर्यंत शेती शाळेचे वर्ग नियमितपणे सुरू राहणार असून, शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने नैसर्गिक व आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वावलंबी, समृद्ध आणि पर्यावरणपूरक शेतीकडे वळण्यासाठी प्रेरित केले जाणार आहे. रसायनमुक्त शेतीकडे शेतकऱ्यांची वाटचाल वाढता उत्पादन खर्च आणि जमिनीच्या घटत्या सुपीकतेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आता नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. कमी खर्चात, स्थानिक साधनांचा वापर करून आणि निसर्गाशी समतोल साधत शेती करण्याचा मार्ग म्हणून नैसर्गिक शेतीकडे पाहिले जात आहे. शेती शाळांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना या पद्धतींचे प्रशिक्षण दिले जात आहे.

## येडशी परिसरात गुड आवाजाचे सत्र सुरू: प्रशासनाकडून खुलाशाची गरज

धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- तालुक्यातील येडशी व परिसरात गेली काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात गुडआवाजाचे सत्र सुरू झाले आहे. हा आवाज दहा - बारा दिवसातून एक वेळेस होण्याचे प्रमाण वाढले आहे . दि १५ बुधवार रोजी सकाळी १०:५ मिनिटांनी व दहा वाजून ३५ मिनिटांनी गुड आवाजाने गाव हादले तर दि १६ रोजी सकळी ९ वाजून ७ मिनिटानी गुड आवाज झाला यामुळे परिसरातील चिंतेची बाब वाढले आहे . याबाबत प्रशासनाकडून खुलासा करून नागरिकांना या आवाजाबाबत खुलासा करण्याची गरज आहे . दि . १५ व १६ रोजीच्या आवाजा बरोबरच काही दिवसाच्या आंतराणे होणारे हे आवाज भूगर्भा मधुन येत आहेत का .का डोंगरपरिसरात खडी केंद्राचे प्रमाण आधिकचे आहे त्या स्थरावरू की शेतिविहीरी खोत कामे की रस्त्यावरून जाणारी अवजड वाहनांचे खड्डे व गतिरोधक प्रसंगी यादि अन्यकारणाने होतो आहेत. पूर्वी आशे आवाज झाले असून यामुळे घरातिल दैनंदिन वस्तूवर व मानवी मनावर होणारे वातावरण शिथिल होते परंतु आज रोजी होत असलेल्या या आवाजाने मात्र घरे घरातील दैनंदिन वस्तू व मानवी मनास हादरवणारे ठरत असल्याने वरिष्ठ प्रशासनाने लक्ष घालून सदर नागरिकात निर्माण होत आसलेले वातावरण दूर करण्याची प्रामुख्याने जबाबदारी व कर्तव्य आहे .अशा स्वरूपाची मागणी ही सामाजिक स्तरावरून होत आहे .


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्ध पुन्हा भडकले

अमेरिका व इराण दरम्यान पुन्हा जोरदार युद्ध भडकले असून क्षेपणास्त्राचा मारा करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा आणखीन युद्ध भडकले जाणार असून त्याचा परिणाम जगावर होणार आहे. अमेरिका हा काही मानवतेच्या दृष्टिने विचार करणारा देश नाही. जागतिक दबाब नाही. अशा स्थितीत अमेरिका मनाला येईल ते पावुल उचलत आहे. या युद्धाचा परिणाम जगात काय होईल याचा विचार केला जात नाही. इराण हा देखिल आता पेटून उठला असून तोही जशाच तसे उत्तर देत आहे. प्रतित्तरादाखल त्यानेही अमेरिकेचे तीन क्षेपणास्त्र पाडले आहेत. जशास तसे उत्तर मिळत आहे. अशा स्थितीत भारताने काय खबरदारी घेतली पाहिजे, या बाबत निर्देश दिले पाहिजेत. युद्धाचा परिणाम सर्वात मोठा इंधनावर होत आहे. तुटवडा निर्माण झाल्यास किंमती वाढल्या जातात हे उघड आहे. इंधनाचे दरात वाढ करण्यात आली असून इंधनाचा वापर काटसरीने करण्याचा संदेश दिला गेला आहे. इंधनाच्या वाढीवदरामुळे भारताने इथेलॉनचा वापराबाबत विचार चालू असून किती प्रमाणात त्याचे पेट्रोलमध्ये समावेश असावा या बाबत विचारविनियम सुरू आहे. दहा टक्क्याचे प्रमाण सांगत असले तरी निश्चित असे प्रमाण दिसून येत नाही. त्यामुळे वेळीच या बाबत सावध भुमिका घेतली जात असली तरी म्हणाव्या तेवढ्या प्रमाणात इंधन बचतीकडे लक्ष दिले जात नाही. मोठ्या प्रमाणात नेते व पुढाऱ्याच्या गाड्याचा ताफा असून दिसून येत आहे. सध्याला सत्ताधारी इंधन बचतीबाबत देखावा केला. अनेकजन मोटारसायकलवरून जातानाचे व्हीडीओ व्हायलर झाले. नंतर गाड्याचा ताफा दिसून येत आहे. या बाबत वेळीच लक्ष देणे अपेक्षित आहे. शासनाकडून कडक धोरणाचा अमल अपेक्षित आहे. सरकारने अजूनही लक्ष नाही दिल्यास इंधनाबाबत मोठे संकट भारतात निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतात अनेक अशी शहरे आहेत तेथे मोठ्या प्रमाणात इंधनाचा वापर होतो. इंधन सर्वत्र लागते. शेतीसाठी आता बैलाचा वापर कमी व यंत्राचा अधिक होताना दिसून येत आहे. यंत्राला मोठ्या प्रमाणात डिझेल लागते. रस्ते कामात जी यंत्रणा लागते तीला इंधनाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. केवळ गाड्यांना इंधन लागते असे नाही दुसऱ्याही इतर बाबीला इंधनाचा वापर लागतो ही बाब लक्षात घेता, इंधनाचा तुटवडा हा मोठी समस्या निर्माण होवू शकते, हीबाब लक्षात घेतली पाहिजे, अमेरिका हा मगरूरपनाने वागत आहे. भारताविरोधक चालत आहे. शंभरटक्के टॅरिफ लावण्याचा पुर्ननोच्चार ट्रम्प यांनी केला आहे. भारतावर इंधनाचे संकट आल्यास तेवढ्यापुरते लक्ष दिले जाते. काही दिवसानंतर तेही विसरले जाते हे योग्य नाही. देशात इंधनाला पर्याय नाही. याचा कधी विचारही केला नाही. आता पर्यंत इंधनाचा तुटवडा जाणवत नव्हता, आता या युद्धजन्य स्थितीमुळे तो जाणवत आहे. अशा स्थितीत भारत हा गाफील दिसत आहे. ज्यावेळी इंधनाचा तुटवडा निर्माण होईल त्यावेळी ओरड होते, संकटापुर्व पर्याय शोधले जात नाहीत. आता पर्यंतचा इतिहास पाहिला तर संकट आल्यावर भारतीय जागे होतात. त्याआधी पर्याय शोधत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे युद्ध ट्रम्प असे पर्यंत संपेल अशी आशा नाही. युद्ध दिर्घ काळ चालत राहाणार आहे. त्यामुळे वेळीच भारतीयांनी सावध झाले पाहिजे. पक्का पर्याय शोधला पाहिजे. युद्ध संपले तर इंधनाबाबत आडचण भासणार नाही. युद्ध संपले पाहिजे या बाबत दुमत नाही. अमेरिका दोन पावले मागे घेण्यात तयार नाही. इराण हा एकण्यात तयार नाही. इराण हा छोटा देश असून महासत्ताधिशी लढतो आहे. दोन हात करण्यात पुढे आहे. अशा स्थितीत मरण मात्र इतर देशाचे होते आहे जे इराणच्या तेलपुरवठ्यावर आवलंबुन आहेत. त्यामुळे वेळीच भारतीयांनी सावध झाले पाहिजे. वेळीच काही पर्याय शोधले पाहिजेत. पर्याय अनेक आहेत. त्यात संशोधन होत नाही. ईलेक्ट्रिक गाड्याची सक्ती व वापर वाढविला पाहिजे. त्या कमी नफ्यात विकल्या पाहिजेत. ईलेक्ट्रिक गाड्या तशा जनसमान्यांनाच्या खिशाला परवडत नाहीत. वास्तविक त्या स्वस्तात मिळाल्या पाहिजेत. उलट त्या महाग दिसून येतात. सरकारने उलट इलेक्ट्रिक गाड्या बनविणाऱ्या कंपनीस मोठ्या प्रमाणात सबसिडी दिली पाहिजे. सवलती दिल्यातरच ते ग्राहकास माफक दरात मिळतील. एकीकडे युद्धाची भीती आहे तर दुसरेकडे पर्याय शोधला जात नाही. पक्का पर्याय दिला जात नाही. अमेरिका हा भारताचा पक्का मित्र होवू शकत नाही. उलट पाकिस्तानला मदत करून भारताला यदाकदाचित तो शह देवू शकेल. भारताने सतत जागृत राहीले पाहिजे. चीनला रोखायाचे झाले व आपल्या बॉर्डरपर्यंत येवू देवू नये असे वाटत असेल तर आजूबाजूच्या लहान देशांना सर्व परिने मदत भारताने केली पाहिजे. आर्थिक व संरक्षणाबाबत मदत केली पाहिजे. भारताला खेटायाचे झाले तर पहिल्यांदा पाकिस्तानला आपल्याशी करावे लागेल असा धुर्त हेतू अमेरिकेचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मोठे ईस्लाम राष्ट्र आहेत, काही कट्टर दहशदवादी आहेत. हिंसा घडविणारे आहेत. ते अमेरिकेशी लढण्यात असमर्थ दिसून येत आहेत. जागजिक दहशदवाद माजविणार काही इस्लाम राष्ट्र असले तरी ते सध्याला बिळात लपलेले आहेत. केवळ भारताविरोधात आवाज उठवित असतात. आज इस्लामराष्ट्रावर अमेकिरका दबाब निर्माण करीत आहे. खत्म करीत आहे, तरी दिड महिण्यापासून कोणत्याही इस्लाम राष्ट्राने अमेरिकेविरोधात आवाज उठविला नाही. हे विशेष लक्षात येते. त्यामुळे इस्लाम राष्ट्र अमेरिकेला घाबरतात. शेपूट घालतात हे उघड दिसून येत आहे. जगाच इराणच्या युद्धाबाबत विचार करीत नाही. जगातील अनेक देश हे इराणच्या इंधनावर आवलंबुन नाहीत ते स्वयंपुर्ण बनले आहेत. त्यांनी अनेक वर्षापुर्वी पर्याय शोधला आहे. त्यामुळे भारताला अजूनही चान्स आहे तो संकटातून बाहेर पडू शकतो. काही मोठ्या निर्णयाची गरज आहे. तसा विचार केला तर अमेरिका व इराण दरम्यान युद्धाचा पुन्हा भडका उडाला आहे. हे संकेत योग्य नाहीत. त्यामुळे भारतीयांनो वेळीच सावध राहावे. वेळीच कठोर निर्णय घ्यावा. युद्ध दिर्घ काळ चालेल असे दिसून येत आहे.

## मराठवाड्यातील युवा उद्योजकांना उद्योग क्षेत्रातील दिग्गजांचे मार्गदर्शन; १८ जुलै रोजी परभणीत ''उद्यम - विकसित मराठवाडा मिशन'' उद्योग-शैक्षणिक संवाद कार्यक्रम




परभणी : चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेस (CASMB), वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (VNMKV), परभणी, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, VNMKV परभणी आणि सेवा भारती देवगिरी, जिल्हा परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सिम्पोझियम हॉल, प्रशासकीय इमारत, तछ्चघत परभणी येथे उद्योग-शैक्षणिक संवाद (Industry-Academia Interaction Programme) आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला UAA (UDCT ॲल्युमनी असोसिएशन), मराठवाडा चॅप्टर आणि AFSTI (असोसिएशन ऑफ फूड सायंटिस्ट्स अँड टेक्नॉलॉजिस्ट्स - इंडिया), परभणी चॅप्टर यांचे सहकार्य लाभले आहे.

हा कार्यक्रम ''उद्यम (UDYAM) - विकसित मराठवाडा मिशन'' अंतर्गत आयोजित करण्यात येत असून, ''विकसित भारत फ विकसित महाराष्ट्र फ विकसित मराठवाडा'' या संकल्पनेवर आधारित CASMB च्या प्रादेशिक विकास अभियानाचा तो एक महत्त्वाचा भाग आहे. ''आत्मनिर्भर मराठवाडा २०३०'' हे या मिशनचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. मेघना साकोरे-बोर्डीकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. इंद्र मणी, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी असतील.

तीन उद्योग क्षेत्रातील दिग्गजांकडून विद्यार्थी व युवा उद्योजकांना मार्गदर्शन या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मराठवाड्याशी घट्ट नाळ असलेल्या तीन यशस्वी उद्योग तज्ज्ञांकडून विद्यार्थी, स्टार्टअप्स आणि युवा उद्योजकांना थेट मार्गदर्शन. सतीश आर. भोरकडे हे खाद्य तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ असून त्यांना खाद्य घटक (Food Ingredients) आणि सीझनिंग उद्योगातील १९ वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी प्रविण मसाले, युनायटेड ब्रुअरीज, व्हीकेएल सीझनिंग्स, वाइल्ड फ्लेवर्स/एडीएम ॲग्रो आणि फ्लावोसिस इंडिया यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये कार्य केले आहे. ते तछ्चघत चे माजी विद्यार्थी असून त्यांनी जगभरातील ५,००० हून अधिक विद्यार्थी व व्यावसायिकांशी संवाद साधत ८० पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत तसेच १२ हून अधिक फूड स्टार्टअप्सना मार्गदर्शन केले आहे.

ते खाद्य घटक, उत्पादन विकास, अन्नप्रक्रिया उद्योगातील करिअर आणि उद्योजकता या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. अतिश जयप्रकाश साळुंखे हे मराठवाड्यातील अग्रगण्य उद्योगपती आहेत. त्यांनी २००६ मध्ये भूमी न्यूट्रास्युटिकल्स प्रा. लि. ची स्थापना केली. आज ही कंपनी महाराष्ट्रातील आघाडीच्या हर्बल एक्स्ट्रॅक्ट आणि न्यूट्रास्युटिकल उत्पादन करणाऱ्या उद्योगांपैकी एक असून ISO, GMP, HACCP, Kosher, Halal, FDA आणि FSSAI अशी विविध मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे प्राप्त आहेत. २०२० मध्ये त्यांनी बंद पडलेला साखर कारखाना पुन्हा सुरू करून त्याची गाळप क्षमता २,५०० टनांवरून ४,५०० टन प्रतिदिन (TCD) पर्यंत वाढवली. तसेच भारत सरकारच्या इथेनॉल मिश्रित पेट्रोल (EBP) धोरणानुसार ६० KLPD क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प उभारला असून त्याचा विस्तार १२० KLPD पर्यंत करण्याचे नियोजन आहे. ग्रामीण भागातील तांत्रिक शिक्षणासाठी त्यांनी बसमत येथे गठऊ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना केली आहे. ते उद्योग पुनरुज्जीवन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण औद्योगिकीकरणाविषयी मार्गदर्शन करतील. श्रीपाद गोरोबा ठोंबरे, प्रकल्प समन्वयक, नॅचरल उद्योग समूह, यांना २०११ पासून नैसर्गिक दुग्ध व्यवसायातील १५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. लातूर येथील यांत्रिकी अभियंता असलेले श्री. ठोंबरे प्रकल्प अंमलबजावणी, दुग्ध मूल्यसाखळी आणि उद्योग संचालन याविषयी सहभागींचे मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमाची रूपरेषा कार्यक्रमाची सुरुवात डॉ. उमेश कांबळे, सरचिटणीस, CASMB यांच्या स्वागतपर भाषणाने होईल. त्यानंतर कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांचे अध्यक्षीय मनोगत, प्रमुख उद्योग मार्गदर्शकांचे प्रमुख व्याख्यान आणि प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन होईल. या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, अन्नप्रक्रिया उद्योजक, स्टार्टअप्स आणि मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSMEs) सहभागी होणार आहेत.

''उद्यम'' मिशनअंतर्गत शेतस्तरावर मूल्यवर्धन (Value Addition at Farm Gate), MSMEs व स्टार्टअप्सना चालना, युवा व महिला उद्योजकता, बाजारपेठ जोडणी व निर्यात आणि शाश्वत विकास या पाच प्रमुख सूत्रांवर भर देण्यात येणार आहे.

मराठवाड्याच्या अन्नप्रक्रिया क्षेत्राला नवी दिशा मराठवाड्यात अन्नप्रक्रिया क्षेत्रात मोठी प्रगती होत असून PMFME योजनेत मराठवाड्याने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्री मा. चिराग पासवान यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या तछ्चघत परभणी येथील कॉमन इन्क्युबेशन सेंटरमुळे स्थानिक उद्योजकांसाठी सुमारे ३२९.५० लाखांच्या अत्याधुनिक प्रक्रिया व परीक्षण सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. प्रतिक्रिया

मा. मेघना साकोरे-बोर्डीकर, राज्यमंत्री व पालकमंत्री, परभणी जिल्हा म्हणाल्या, ''मराठवाड्यातील युवकांमध्ये क्षमता आणि प्रतिभेची कमतरता नाही; गरज आहे ती योग्य संधी आणि व्यासपीठाची. ''उद्यम'' सारख्या उपक्रमांमुळे उद्योग क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती थेट विद्यापीठात येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. यामुळे नव्या पिढीला उद्योग उभारण्याची प्रेरणा मिळते. महाराष्ट्र शासन प्रत्येक उद्योजकाच्यापाठीशी ठामपणे उभे आहे. विकसित महाराष्ट्रातून विकसित भारताचा मार्ग याच माध्यमातून घडणार आहे. डॉ. इंद्र मणी, कुलगुरू, तछ्चघत म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आम्ही उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांना ''प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'' म्हणून नियुक्त केले आहे. आमचे कॉमन इन्क्युबेशन सेंटर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग अनुभव देत आहे. या संवाद कार्यक्रमामुळे यशस्वी उद्योगपती आणि आमचे विद्यार्थी एकाच व्यासपीठावर येतील. यामुळे कृषी पदवीधर नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनतील. डॉ. उमेश कांबळे, सरचिटणीस, CASMB म्हणाले, ''उद्यम'' हे CASMB चे असे अभियान आहे की मराठवाड्यात उत्पादित होणाऱ्या कृषी उत्पादनांचे प्रक्रिया, ब्रँडिंग आणि विपणनही मराठवाड्यातच व्हावे. सतीश भोरकडे, अतिश साळुंखे आणि श्रीपाद ठोंबरे यांसारखे यशस्वी उद्योग तज्ज्ञ जेव्हा आपल्या मातीतल्या युवकांना थेट मार्गदर्शन करतात, तेव्हा त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत नव्या स्टार्टअप्स आणि चडचएे उभे राहावेत, हेच आमचे ध्येय आहे.

आयोजक व सहकार्य संयुक्त आयोजक : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (VNMKV), परभणी; अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, तछ्चघत परभणी; चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेस (CASMB); सेवा भारती देवगिरी, जिल्हा परभणी सहकार्य : UAA (UDCT ॲल्युमनी असोसिएशन), मराठवाडा चॅप्टर; AFSTI, परभणी चॅप्टर नोंदणी व संपर्क : डॉ. आर. बी. क्षीरसागर - +९१ ९८३४९ ०५५८० । डॉ. उमेश कांबळे - +९१ ८५९१९ ६०९३१ CASMB विषयी चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेस (CASMB) ही संस्था सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. तंत्रज्ञान, कौशल्य विकास, बाजारपेठ, निर्यात संधी आणि शासकीय योजनांशी उद्योजकांना जोडण्याचे काम CASMB करते. उद्योग, विद्यापीठे, वित्तीय संस्था आणि शासन यांना एका व्यासपीठावर आणून उद्योजकांना कल्पनेपासून बाजारपेठेपर्यंत सक्षम करण्यासाठी संस्था कार्यरत आहे.

CASMB चे नेतृत्व डॉ. प्रबोध हळदे (चेअरमन), निलेश लेले (अध्यक्ष) आणि डॉ. उमेश कांबळे (सरचिटणीस) करत आहेत.

**माध्यम संपर्क :**
**विजय गायकवाड**
CASMB
+९१ ९८७०४४७७५०

## 'स्पिक मॅके'च्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट



**मुंबई/प्रतिनिधी:** 'सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ इंडियन क्लासिकल म्युझिक अँड कल्चर अमंग युथ' ('स्पिक मॅके) च्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेतली.

शिष्टमंडळाने भारतीय शास्त्रीय संगीत आणि संस्कृतीचा प्रसार करणाऱ्या 'स्पिक मॅके या संस्थेच्या उपक्रमांविषयीची माहिती देणारी 'संदेश' या पुस्तिकेची प्रत राज्यपालांना भेट दिली तसेच राज्यपालांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्ली येथे होणाऱ्या 'स्पिक मॅके'च्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचे निमंत्रण दिले.

यावेळी कल्पेन शुक्ला, नेहा बंद्योपाध्याय, गीता प्रकाश, सब्यसाची डे आणि सिम्पी सिंह उपस्थित होते.

## महाराष्ट्राला सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य बनवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

➤ मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गव्हर्नन्स प्रोसेस रि-इंजिनियरिंग संदर्भात तिसऱ्या टप्प्याची बैठक

➤ इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या दोन प्रकल्पाचे लोकार्पण



**मुंबई/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या गव्हर्नन्स प्रोसेस रि-इंजिनियरिंग (जीपीआर) उपक्रमांतर्गत शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात येत असून, सर्व विभागांनी १५ ऑगस्टपर्यंत भरीव प्रगती करावी. तसेच प्रत्येक सेवेचे नव्याने पुनरावलोकन करून कागदपत्रांची संख्या कमी करावी. महाराष्ट्राची सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य अशी ओळख निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जीपीआरच्या तिसऱ्या टप्प्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच मंत्रालयातील सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'जीपीआर' अंतर्गत प्रत्येक सेवेसाठी सहा टप्प्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली असून त्यामध्ये जीपीआर अहवाल, मुख्यमंत्री कार्यालयाशी चर्चा, विभागीय मंजुरी, महाआयटीमार्फत तांत्रिक विकास, शासन निर्णय निर्गमित करणे आणि अंतिम चाचणी यांचा समावेश आहे. सर्व विभागांनी १५ ऑगस्टपर्यंत किमान पाचव्या टप्प्यापर्यंत, म्हणजे आवश्यक शासन निर्णय निर्गमित करून सेवा अंतिम चाचणीसाठी तयार ठेवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**सेवांचे एकत्रीकरण व सुलभीकरण**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने शासकीय सेवांचे व्यापक पुनरावलोकन केले आहे. त्यानुसार विविध विभागांतील सेवांचे एकत्रीकरण व सुलभीकरण करून सेवांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये दुहेरी सेवांचे एकत्रीकरण तसेच कालबाह्य व अन्य सेवांची समाप्ती करण्यात आली आहे.

महाडीबीटी २.०, मैत्री आणि आपले सरकार २.० या डिजिटल प्लॅटफॉर्मवर सर्व शासकीय सेवा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. सेवा वितरणात कोणताही तांत्रिक अडथळा येणार नाही, यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने सक्षम तांत्रिक व्यवस्था उभारावी, तसेच सर्व कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

**डेटा नालिटिक्स ज अ सर्व्हिस आणि मिनी सेतू केंद्र प्रकल्पाचे लोकार्पण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या डेटा नालिटिक्स ज अ सर्व्हिस आणि मिनी सेतू केंद्र या दोन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पणसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डेटा नालिटिक्सच्या वापरामुळे प्रशासनातील उत्तरदायित्व अधिक प्रभावी होत असून गैरव्यवहार रोखणे, शासनाचा निधी वाचविणे आणि सेवा वितरणात पारदर्शकता वाढविणे शक्य होते. गडचिरोली जिल्ह्यातील माओवादमुक्त भागांमध्ये 'पोलीस दादालोरा खिडकी'चे 'सेतू केंद्रात' रूपांतर करण्याचा निर्णय नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे सांगून या भागांमध्ये सर्व शासकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## महाराष्ट्र सदनात जिप्सीचा विशेष खेळ प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** येथील महाराष्ट्र सदनच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या जिप्सी या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या मराठी चित्रपटाच्या विशेष खेळास चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या नवी दिल्लीतील विशेष निवासी आयुक्त श्रीमती श्वेता सिंघल यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कस्तुरबा गांधी मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात जागरण ग्रुपच्या सहकार्याने जागरण फिल्म फेस्टिव्हल अंतर्गत जिप्सी या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या मराठी चित्रपटाच्या विशेष खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या नवी दिल्लीतील निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांच्यासह सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे व स्मिता शेलार, दैनिक जागरण समूहाच्या प्राची पंडित, आयना कपूर आणि सऊद अहमद आदी उपस्थित होते. महाराष्ट्र सदन हे केवळ एक शासकीय विश्रामगृह न राहता, महाराष्ट्राच्या कला, संस्कृती, साहित्याच्या प्रसार व संवर्धनासाठी काम करणारे एक प्रमुख सांस्कृतिक केंद्र (कल्चरल हब) म्हणून विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे, असे सांगून सिंघल म्हणाल्या, येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सर्व मराठी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. मराठी रंगभूमी आणि मराठी चित्रपटसृष्टीचा कलाविष्कार अत्यंत समृद्ध असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

'जिप्सी' या चित्रपटाचे दिग्दर्शक शशी खंडारे यांना पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला असून त्यात कबीर खंडारे यांनी ज्योतीया नावाच्या मुलाची मुख्य भूमिका साकारली आहे. जागरण फिल्म फेस्टिव्हल हा दैनिक जागरणचा उपक्रम असून ८ राज्ये आणि १४ शहरांमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

आखाती देश तेलामुळे समृद्ध झाले आणि अमेरिकेची तळी उचलून धरल्याने दिवाळखोरीच्या दिशेने निघाले. पर्यटकांचे आकर्षण, सुरक्षित गुंतवणूक या तेथील देशांच्या प्रतिमेला तडा गेला.
कुठलीही टोकाची भूमिका घेऊन संघर्षाला विराम मिळत नाही. अमेरिका आणि इराण या दोघांनाही या वस्तुस्थितीचा विसर पडला आहे. दोन्ही देशांनी केलेल्या तथाकथित शांतता कराराच्या पार चिंधड्या उडाल्या असून आखा-तातील युद्धाला गंभीर स्वरूप आले आहे. अमेरिकेने इराणमधील शेकडो ठिकाणांवर हल्ले केले. याला प्रत्युत्तर देत इराणने बहारिन, कुवेत, जॉर्डन, कतारसह आखाती देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. शांतता




प्रमाणात यशस्वी झाला.
लक्षणीय लष्करी आणि तंत्रज्ञानाची ताकद नसताना युक्रेन रशियाच्या तेलसाठ्यांवर हल्ले करून रशियाला अगतिक करू पाहतो, या मागील सूत्रधार उघड आहेत. जागतिक बड्या देशांकडून या लढाईसाठी अधिक पाठबळ मिळत आहे, असे युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी अलीकडेच जाहीरपणे सांगितले. या पार्श्वभूमीवर इराणमध्ये रशियाच्या हवाई दलाचे टी यू २१४ हे विमान पोहोचले. इराण नेस्तनाबूत होऊन पश्चिम आशियामधील युद्ध संपावे; पण युक्रेन-रशिया यांच्यातील संघर्ष कायम राहिला पाहिजे, ही दुट्टपी भूमिका कशी चालेल? हवाई दलाच्या मदतीने इराणवर हल्ले सरू ठेवून त्याला नमवता येईल, असे अमेरिका समजते. तो समज चुकीचा ठरणार आहे. प्रत्यक्ष सैन्य जमिनीवर उतरल्याशिवाय एखाद्या देशाचा युद्धात पराभव करता आला, असे उदाहरण नाही. इराणमध्ये थेट सैन्य उतरवण्याचे धाडस अमेरिकेत नाही. अमेरिकेने ते धाडस दाखवलेच, तर मृत्युमुखी पडणार्या सैनिकांची संख्या एवढी असेल, की ट्रम्प यांना पायउतार व्हावे लागेल. अली खामेनी यांच्याबद्दल इराणच्या नागरिकांमध्ये एवढा

# इरान होर्मुज : शांतता कठीण

कराराच्या उल्लंघनाची जबाबदारी एकमेकांवर ढकलून इराण आणि अमेरिका आपल्या युद्धखोरीचे समर्थन करत आहे. आज युद्धाची व्यापकता वाढली, याचे कारण डोनाल्ड ट्रम्प यांचे धरसोडीचे धोरण, मुत्सद्देगिरीचा त्यांच्यात असलेला पूर्ण अभाव आणि परिणामांचा विचार न करता निर्णय घेण्याची वृत्ती. मुळात युद्ध इस्रायल आणि इराण यांच्यात होते, विजयाच्या खात्रीने त्याचे श्रेय घेण्यासाठी अमेरिका युद्धात उतरली. त्यात पूर्ण फसल्यावर यशस्वी माघार घेतल्याचे भासविण्यासाठी शांतता कराराची घाई झाली. त्यातही अमेरिकेचे हसे झाले. कारण, इराणवरील निर्बंध हटविण्यापासून होर्मुझ सामुद्रधुनीवर त्याचा नसलेला अधिकार प्रस्थापित करण्याच्या तरतुदी ट्रम्प यांनी त्यात करून घेतल्या. पूर्ण इराणच्या बाजूने झुकलेला हा करार इस्रायलला मान्य नव्हताच; पण किमान इराणमध्ये तरी त्याबद्दल सर्वसंमती असावी, अशी अपेक्षा होती. मात्र; तेथील अंतर्गत संघर्षामुळे ते होऊ शकलेले नाही. इराण रिव्होल्युशनरी गार्ड्स आणि फार अधिकार नसलेले तेथील नागरी सरकार यांच्या संघर्षामुळे इराणचे सत्ताकेंद्र विभागले गेले आहे.

**दुट्टपी भूमिका**

होर्मुझमध्ये काही जहाजांवर झालेल्या हल्ल्यानंतर परिस्थिती अधिक चिघळली. तो हल्ला इराणी रिव्होल्युशनरी गार्ड्सकडून झाला, असे सांगितले जाते. इराण-अमेरिका युद्धाला दुसरेही परिमाण आहे. रशियाला युक्रेनबरोबरच्या युद्धात अडकवून ठेवण्याचा अमेरिका आणि युरोपीय देशांचा डाव बर्याच

संताप आहे, की आपण हल्ले करण्याचा अवकाश, तेथे सत्तापालट होईल, असे म्हणे ट्रम्प यांना सांगण्यात आले होते. त्यातून त्यांनी युद्ध सुरू करून हाराकिरीचा निर्णय घेतला. खामेनींच्या अंत्यसंस्काराला उपस्थित कोट्यवधी नागरिकांची प्रतिक्रिया ट्रम्प यांना हादरवणारी ठरली आहे. इराणने खामेनींना संपविणार्या ट्रम्प यांच्यासह अन्य देशांच्या प्रमुखांची यादी जाहीर केली आहे. आगीत तेल ओतणारी ही भूमिका आणि त्यावरची ट्रम्प यांची टोकाची प्रतिक्रिया, यामुळे पश्चिम आशियातील युद्धाचे चटके कमी होण्याची शक्यता दूर चालली आहे. तेलवाहू जहाजांवरील खलाशांमध्ये भारतीयांची संख्या अधिक असून त्यांची सुरक्षितता हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे. होर्मुझवर अमेरिका आपल्या लष्करी ताकदीवर नियंत्रण मिळवेल; पण ते कायमस्वरूपी असू शकणार नाही. तेल, वायू याची वाह-तूक सुरळीत करण्यासाठी आता सर्व संबंधित देशांना अमेरिकेला कर द्यावा लागणार आहे. जागतिक संकटातही फायद्याची संधी शोधणारी ही मानसिकता युद्धविरामासमोरील मोठे आव्हान होय.

# महागाईत सामान्य जनतेला दुहेरी धक्का

जागतिक घडामोडींमुळे महागाई वाढत आहे हे सरकारचे म्हणणे आहे. हेच कारण पूर्वीच्या सरकारने दिल्यावर आता सत्तेत असलेला पक्ष ते मान्य करत नव्हता. महागाई रोखण्यास सरकारने उपाय योजल्याचे दिसत नाही.
देशात महागाई सतत वाढत आहे, यास सरकारने दुजोरा दिला आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई वाढीचा दर जूनमध्ये ४.३८ टक्के झाला. गेल्या दीड वर्षांतील तो सर्वात जास्त आहे. मे महिन्यात तो ३.९८ टक्के होता. घाउक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईवाढीचा दर ९.८७ टक्के झाला.



मे महिन्यात तो ९.६८ टक्के होता. हा वाढीचा वेग गेल्या २७ महिन्यांतील सर्वात जास्त आहे. त्या साठी सरकारतर्फे दिले गेलेले स्पष्टीकरण नेहेमीचेच आहे. अन्न धान्य व खाद्य पदार्थ यांच्या किंमती वाढल्याने महागाई वाढली हे कारण नागरिकांना माहीत झाले आहे. कारण त्याचा ते रोजच सामना करत आहेत. घाउक किंमती वाढल्याने किरकोळ दरांमध्ये वाढ होणार हे साधे तर्कशास्त्र आहे. ते रोखण्यासाठी सरकार काय करणार आहे किंवा काय केले हे सांगितले गेलेले नाही. महागाईवाढीसाठी पश्चिम आशियातील युद्धाचे कारण गेले तीन महिने दिले गेले. ते अजूनही कायम आहे. हेच कारण असूनही इंग्लंड मध्ये महागाईवाढीचा दर २.८ टक्के आहे. तो सुद्धा जास्त असल्याचे तेथील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अमेरिका या युद्धात सहभागी असूनही तेथील महागाईवाढीचा दर जूनमध्ये ४.२ वरून ३.५ टक्के असा कमी झाला. भारतात महागाई सतत का वाढत आहे हे कळत नाही.


पावसाचा दोष....?

घाउक किंमत निर्देशांकानुसार अन्न-धान्य गटाचा महागाई वाढीचा दर ६.१४ टक्के झाला. तो गेल्या १८ महिन्यांतील उच्चांकी आहे. याच गटाचा किरकोळ महागाई वाढीचा दर जून मध्ये ५.३२ टक्के झाला. मे मध्ये तो ४.७८ टक्के होता. देशात पावसाळ्याची मोजणी १ जून पासून होते.यंदा गेल्या महिन्यात सरासरीपेक्षा १९.३ टक्के पाऊस कमी झाला.

पालेभाज्या, टॉमेटो, आले आदींचे भाव त्यामुळे वाढले. त्याचे प्रतिबिंब निर्देशांकात उमटले. मात्र हा एकच घटक महागाईला जबाबदार नाही. पश्चिम आशियातील युद्धाचे कारण देत पेट्रोल व डिझेलचे दर सरकारने चार वेळा वाढवले. युद्ध जरी फेब्रुवारीच्या अखेरीस सुरु झाले असले तरी विधानसभा निवडणुका झाल्यानंतर मे महिन्यात दरवाढ करण्यात आली. त्याचा परिणाम जूनम्मधे जाणवला. स्वयंपाकाच्या गॅसच्या घरगुती सिलिंडरच्या किंमती दोनदा वाढवण्यात आल्या. सरकार ज्याची जाहिरातबाजी करते त्या 'उज्ज्वला' योजनेतही केवळ चार सिलिंडर्ससाठी अनुदान आहे तरीही त्याचा दर ६४२ रुपये आहे. बाकी सिलिंडर्स बाजारभावाने घ्यावे लागत असतील तर या योजनेने 'गरीब महिला सक्षम झाल्या' हे कशाच्या आधारे म्हणणार? व्यावसायिक गॅस सिलिंडर्सच्या किंमतीही मे महिन्यात जवळपास हजार रुपयांनी वाढवल्या गेल्या. जूनमध्ये त्यात किरकोळ कपात करण्यात आली असली तरी त्यांचे दर ३००० रुपयांच्या आसपास आहेतच. परिणामी महागाई वाढीचा दर वाढला. इंधन व ऊर्जा गटाचा महा-गाई वाढीचा दर थोडा कमी झाल्यासारखे दिसते, याचे कारण त्याची मागणी कमी झाली. प्राथमिक वस्तू म्हणजेच कच्च्या मालाच्या महागाई वाढीचा दर जूनमध्ये ९ टक्क्यांवर गेला. मे मध्ये तो ४.९९ टक्के होता. याचा अर्थ त्यात जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. साहजिकच उत्पादित किंवा तयार वस्तूंच्या महागाई वाढीचा दर ७.४८ टक्क्यांवर कायम आहे. खाद्य तेलांचे दर गेल्या तीन महिन्यांत १७ ते १९ टक्क्यांनी वाढले. रुपयाची घसरण व वाढती महागाई यामुळे भारतीयांची क्रयशक्ती घटत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे यंदा खरीप पिकांच्या लागवडी खालील क्षेत्रात सुमारे १६ टक्के घट झाली आहे. देशाच्या अनेक भागातील पाऊस सध्या थांबला आहे. परिणामी यंदा खरिपाच्या पिकांचे उत्पादनही कमी होणार आहे. त्याचा अर्थ टंचाई आणि भाववाढीचे दुष्ट चक्र कायम राहाणार आहे. किरकोळ महागाईवाढीचा दर रिझर्व बँकेच्या निर्धारित 'पट्ट्या'त असला तरी त्याची झळ सामान्यांना जास्त जाणवत आहे. आगामी काही महिने त्यातून दिलासा मिळणार नाही हे नक्की. हा धोका ओळखून पुरवठा साखळी मजबूत करण्यावर सरकारने लक्ष का केंद्रित केले नाही; हा प्रश्न अनुत्तरित आहे.

## उपदेशकथा:चित्रकाराचा सन्मान

भोजराजाच्या आश्रयाला अनेक नाट्य कलाकार, संगीततज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार येत असतात. तो त्यांचा यथोचित आदर करी नि भरपूर धन देऊन सन्मानाने परत पाठवी. चित्रकार शिवशर्मा एकदा शेषनागाने एक अप्रतिम चित्र तयार केले. नंतर स्वत: ते चित्र राजदरबारात आणून राजाला भेट म्हणून त्याने अर्पण केले. ङ्गवा! फारच छान आहे चित्र आहे हे आपले.फ राजा कौतुकाने म्हणाला व आपल्या पद्धतीप्रमाणे दहा हजार मोहोरांची देणगीही जाहीर केली. पण शिवशर्मा



केवळ चित्रकारच नव्हता. तो उत्तम कवीसुद्धा होता. चटकन तो बोलून गेला, ङ्गमहाराज, बेडकांना भक्षण करणारे नाग जागोजागी दिसतात. पण पृथ्वीचा भार सोसणारा एक शेषनागच बरं.फ शेषनागाच्या उद-ाहरणातून सर्वांना आश्रय देणाऱ्या भोजराजाची त्याने केलेली ती स्तुती आणि त्याचबरोबर गोरगरीबांना पिळणाऱ्यांची केलेली निंदा चतुर राजाच्या लक्षात आल्यावाचून कशी राहील? संतुष्ट होऊन आणखी पंचवीस हजार मोहोरा त्याने शिवशर्माला दिल्या. राजदरबारातल्या इतर काही चित्रकारांना ही गोष्ट अर्थातच रुचली नाही. त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल एवढे मोठे बक्षीस कदापि मिळाले नव्हते. राजाला त्यांच्या चेहऱ्याची नाराजी चटकन समजली व तो म्हणाला, ङ्गमित्रांनो, चित्रकला नि काव्यकला यांचा अजोड संगम झालाय शिवशर्मात. दुग्धशर्करायोग. मणिकांचन योग म्हणतात तो यालाच बरे!फ इतर चित्रकारांनीही मग शिवशर्माचा मोठेपणा मान्य केला आणि भोजनाच्या दरबारात आणखी एक नवरत्नाची भर पडली.

**कथा उपदेश**

अंगात गुण असले की कधी कधी तरी त्याचे चीज होते.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



आहारात कॅल्शियम आणि लोह यांचं प्रमाण भरपूर असेल, अशा पदार्थांचा समावेश करावा. यात मेथी, पालक, हिरव्या पालेभाज्या यांचा समावेश आहे. कोबी या भाजीत अँटिऑक्सिडन्ट असतात. व्हिटॅमिन आणि फॉलेट-फायबरही असतं. सॅलडच्या स्वरुपात भाज्यांचा आहारात समावेश करा. कॅल्शियम हाडांमधील महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या कमतरतेमुळे हाडं कमजोर होतात. ङ्गन्यूरो सिस्टमम चांगलं ठेवण्यासाठी कॅल्शियम महत्त्वाची भूमिका बजावते. कॅल्शियमचं प्रमाण कमी झाल्यास शरीरात उप-लब्ध असलेलं कॅल्शियम अधिक प्रमाणात वापरलं जातं. त्यामुळे हाडांमधील कॅल्शियम कमी होण्यास सुरुवात होते. परिणामी हाडांचं दुखणं सुरू होतं. अनेकदा दुखण्याचं हे दुष्टचक्रच बनतं.हिमोग्लोबीन-हा शरीरातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

## २ Joke विनोद




**स्पर्धा :**

न्यायालयाजवळील टायपिंगच्या दुकानावर पाटी होती, ङ्गकागदपत्रे टाईप केली जातात, तीन भाषेत.फ काही दिवसांनी त्याच्याजवळ दुसरे दुकान निघाले. तिथे पाटी होती, मझेरॉक्स प्रती मिळतील कोणत्याही भाषेत.

## ३ Message संदेश



Santa badi der se apne room me kuch dhoond rha tha,
pareshan hokar uski biwi Jeeto boli Jeeto – Kya dhoond rahe ho?
Santa – Hidden Camera
Jeeto – Tumhe Kaise pata is room me hidden camera hai?
Santa – Agar hidden camera nahi hota to T.V. wale is aadmi ko kaise pata hota ki hum star plus dekh rahe hain, bar bar ye -"aap dekh rahe hain star plus" bol raha hai.

## ४ Thought सुविचार




जगातील सर्व प्रतिभासंपन्न माणसे ईश्वराच्या समीप असतात.
– स्टीव्हनसन

**संस्कृत सुभाषित**

स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।
सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम।।

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा
४. हिरव्या रंगाचा कीटक
७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा
९. काचेवरील ओरखडा
१०. नित्यनेमाने केलेले वाचन
११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद)
१२. अडथळा, पाचर
१३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द
१५. गंगाजल
१७. कैकेयीची दासी
१८. हिंदीत पैंजण
२०. पहारा, रक्षण
२१. अंतर्गत
२२. साद
२४. अनामिकेशेजारील बोट
२४अ. धमनी, नाडी
२५. बांबू
२७. आठवड्यातील दिवस
२८. तोल सांभाळण्याची कामगिरी
३०. पथारी
३३. नाहक, विनाकारण
३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या
३६. शाहीराजवळचे वाद्य
३८. नाडी
३९. जिन्नस
४०. पद्धत
४१. एक प्रायश्चित कर्म
४२. चिंता
४४. कर्णाची उपाधी
४५. सगेसोयरे
४७. बहुपेडी साखळी
४८. वावडी, ऐकीव गोष्ट
५०. आभाळ
५१. अदृश्य
५४. पर्वत
५६. खण पण चोळीचा नव्हे
५७. पोपट
५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट
६१. मृदंग
६३. लक्ष्मी
६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष
६६. 'जैसे थे' परिस्थिती
६७. फटफजिती होईल असे
७०. बाण
७२. पाणी ओघळून जाईल असा उतार
७३. मुलगा, पुत्र
७४. एकत्रित भोजन
७५. नवलाची कामगिरी

## उभे शब्द

१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे –
२. प्रवाह
३. ललाट
४. दुर्लक्ष, हेळसांड
५. वाळवंट
६. अणकुचीदार
७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला
८. धनुष्यबाण
११. लुटालुट
१२. हिंदीत काकडी
१४. ताबडतोब पैसे मोजून
१६. गौरवर्णी, साजिरी
१८. स्तर
१९. बारीकसारीक, किरकोळ
२१. चूक, अवमान
२३. उणीव, कमतरता
२४. नव्या नोटेचा स्पर्श
२६. काखेत मावणारी घागर
२७. प्रशंसेचा उद्गार
२८. सत्त्वयुक्त
२९. त्वरित, अचानक
३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते
३२. गावभर स्वैर भटकणारी
३४. नातेवाईक
३७. मोबदला, परिणाम
४३. पाणी, आयुष्य
४५. हिंदीत अपवित्र
४६. कोट, किल्ला
४९. रममाण झालेला
५२. पावलोपावली, सतत
५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस
५५. चांदोबाची सुट्टी!
५८. दागदागिने
६०. फार, खूप
६२. प्राप्ती, आवक
६५. घाव, प्रहार
६७. सोने
६८. उणीव पण न भासणारी
६९. राज्य
७१. ज्वाला, दाह

## आडवे उत्तर

१.सुधारक ४.हरणटोळ ७.पनवती ९.धाक
१०.पारायण ११.कसारा १२.खीळ १३.गदारोळ
१५.गंगोदक १७.मंथरा
१८.पायल २०.रखवालदारी २१.आत
२२.हाक २४.करंगळी २४अ.नस २५.कळक
२७.वार २८.कसरत ३०.वळकटी
३३.हकनाक
३५.सहा ३६.डफ ३८.शीर ३९.नग
४०.रीत ४१.गोदान ४२.काळजी
४४.दानवीर ४५.नातलग ४७.गोफ
४८.वदंता
५०.नभ ५१.गडप ५४.नग ५६.कप्पा
५७.कीर
५९.मानिनी ६१.पखवाज
६३.कमला ६४.प्रतिवादी ६६.रमारम
६७.हास्यास्पद
७०.शर ७२.पाणलोट ७३.तनय
७४.अंगतपंगत ७५.करामत

## उभे उत्तर

१.सूचनामंत्री २.धारा ३.कपाळ ४.हयगय ५.रण
६.टोकदार ७.परागंदा
८.तीरकमठा ११.पळवापळव १२.खीरा
१४.रोख १६.गोरीगोमटी १८.पातळी
१९.लहानसहान २१.आगळीक २३.कसर
२४.करकरीत २६.कळशी २७.वाह २८.कसदार
२९.तडकाफडकी ३१.करदाता ३२.नगरभवानी
३४.नातलग ३७.फळ ४३.जीवन ४५.नापाक
४६.गड ४९.दंगलेला ५२.पदोपदी ५३.शनिवार
५५.अमावस्या ५८.रकमपात ६०.अतिशय
६२.जमा ६५.वार ६७.हाटक ६८.ददात
६९.प्रांत ७१.आग




## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारताचे खेळाडू कॉमनवेल्थ गेम्स २०२६ साठी सज्ज!

**दिल्ली**–कॉमनवेल्थ गेम्स २०२६ काही दिवसांमध्ये सुरु होणार आहे, यामध्ये भारताचे काही दिग्गज खेळाडू हे सहभागी होणार आहेत. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्स २०२६ येथे स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीमध्ये एक भारतीय ऑलिम्पिक संघटनेने ग्लासगो राष्ट्रकुल खेळांसाठी रवाना होणाऱ्या देशाच्या खेळाडूंच्या तुकडीला भव्य निरोप दिला. या समारंभामध्ये भारतीय खेळाडू खेळांच्या उद्घाटन समारंभामध्ये बक्षीस वितरण आणि स्पर्धांमध्ये परिधान करणार असलेल्या अधिकृत किट आणि जर्सीचे अनावरणही करण्यात आले. आता होणाऱ्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारतामध्ये हे खेळ कधी पाहता येणार आणि कोणते खेळाडू सहभागी होणार यासंदर्भात सविस्तर माहिती देणार आहोत.
भारताचे कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये पॅरा–ॲथलीटसह १२४ स्पर्धकांचा एक मजबूत संघ पाठवला जाणार आहे.

### ३०० पार झाले असते पण टीम इंडिया २३३ वर ऑलआऊट

दिल्ली–कार्डिफच्या सोफिया गार्डनच्या मैदानात इंग्लंडच्या भेदक गोलंदाजीसमोर टीम इंडियाचा डाव गडगडला आहे. त्यामुळे टीम इंडिया २४० धावांवर ऑल आऊट झाली आहे. खरं तर टीम इंडिया ३०० धावा हमखास करू शकली असती पण त्या दोन बॉलने अख्खी मॅच फिरली. त्यामुळे नेमकं असं काय झालं ज्यामुळे टीम इंडिया २४० धावाच करू शकली? हे जाणून घेऊयात. खरं तर इंग्लंडने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे टीम इंडिया प्रथम फलंदाजीला उतरली होती. यावेळी टीम इंडियाकडून कॅप्टन शुभमन गिल आणि रोहित शर्माने डावाची चांगली सुरूवात केली होती. पण नंतर पुढे शुभमन गिल ३१ धावांवर बाद झाला होता. गिल बाद झाल्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली मैदानात होते.

### ५३७ रन, ५१ सिक्स... पूरन-पोलार्ड-स्मिथचे वादळ!

मुंबई–५३७ रन, ५१ सिक्स आणि ३ शतकं, टी–२० क्रिकेटच्या इतिहासातील सगळ्यात मोठा रन चेसचा विक्रम झाला आहे. मेजर क्रिकेट लीग (एमएलसी) २०२६ च्या एलिमिनेटर–१ च्या सामन्यात हा रेकॉर्ड झाला. ऑकलंडमध्ये झालेल्या या सामन्यात टी–२० क्रिकेटची सगळी रेकॉर्ड उद्ध्वस्त झाली. एमआय न्यूयॉर्कने या सामन्यात पहिले बॅटिंग करताना २० ओव्हरमध्ये २६६९ रन केले. या आव्हानाचा पाठलाग वॉशिंग्टन फ्रीडमने फक्त १८.४ ओव्हरमध्ये २७०४ बनवून केला आणि ६ विकेटने सामना जिंकला. दोन्ही टीमनी मिळून ५३७ रन केले आणि ५१ सिक्स मारल्या. टी–२० क्रिकेटच्या इतिहासातील हे सगळ्यात यशस्वी रन चेस आहे. याआधी हा विक्रम पंजाब किंग्सच्या नावावर होता. आयपीएल २०२६ मध्ये दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पंजाबने २६५ रनच्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला होता. तर तिसऱ्या क्रमांकावरही पंजाब किंग्सच आहे,

### कायरन पोलार्ड- टी-२० क्रिकेटमध्ये १ हजार सिक्स पूर्ण

नवी दिल्ली–एजबॅस्टन येथे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान आयसीसी आचारसंहितेच्या लेव्हल १ उल्लंघनासाठी दोषी आढळल्याने, युवा भारतीय वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारला अधिकृत ताकीद आणि एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे. ही घटना १४ जुलै रोजी इंग्लंडच्या डावातील आठव्या षटकात घडली. क्षेत्ररक्षण करताना, ब्रारने चेंडू उचलून तो फलंदाजाच्या दिशेने अयोग्य आणि संभाव्य धोकादायक पद्धतीने फेकला, जे आचारसंहितेचे उल्लंघन आहे. आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान क्रिकेटपटूच्या दिशेने किंवा जवळ अयोग्य किंवा संभाव्य धोकादायक पद्धतीने चेंडू फेकण्याशी संबंधित असलेल्या, क्रिकेटपटू आणि क्रिकेटपटूंच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.९ चे उल्लंघन

# चाहत्यांना मोठा धक्का? रोहितनंतर 'हा' स्टार खेळाडूही घेणार निवृत्ती?

**नवी दिल्ली:** भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला होता. तर मालिकेतील दुसरा सामना जिंकून इंग्लंडने वनडे मालिकेत १–१ ने पुनरागमन केलं आहे. हा सामना इंग्लंडने जिंकला, पण इंग्लंडच्या विजयाहून जास्त चर्चा रंगली ती रोहित शर्माच्या निवृत्तीची. रोहित शर्मा हा वनडे वर्ल्डकप २०२७ सेटअपचा भाग नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे इंग्लंडविरूद्ध लॉर्ड्सच्या मैदानावर होणारा तिसरा वनडे सामना हा त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील शेवटचा सामना असू शकतो. पण रोहितसह आणखी एक स्टार खेळाडू आहे, जो लवकरच निवृत्तीची घोषणा करु शकतो. द टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, भारताला टी–२० वर्ल्डकप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावणारा रवींद्र जडेजाचा वनडे क्रिकेटमधील प्रवास लवकरच संपू



शकतो. यामागचं सर्वात मोठं कारण, अक्षर पटेल आहे. डावखुऱ्या हाताचा फिरकी गोलंदाज, फलंदाजीत दमदार कामगिरी करत असलेला अक्षर हा रवींद्र जडेजाची जागा घेण्यासाठी योग्य पर्याय आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात फलंदाजी करताना त्याने अर्धशतकी खेळी करून भारतीय संघाच्या विजयात मोलाचं योगदान दिलं होतं. या कामगिरीच्या बळावर त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली होती. या सामन्यात त्याने फलंदाजीत आणि गोलंदाजीत मोलाचं योगदान दिलं होतं. रवींद्र जडेजाला गेल्या काही मालिकांसाठी भारतीय संघात स्थान दिलं गेलं नव्हतं. इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठीही त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही.

> **मानव सुथारला मिळाली जडेजाच्या जागी संधी**
> तर कसोटी क्रिकेटमध्ये मानव सुथारला संधी दिली गेली आहे. जडेजासारखीच फलंदाजी आणि गोलंदाजी करण्याची शैली असलेल्या मानव सुथारने अफगाणिस्तानविरुद्ध खेळताना पदार्पण केलं होतं. पहिल्याच सामन्यात त्याने दमदार कामगिरी केली होती. त्यामुळे जडेजाला आता निवृत्तीशिवाय पर्याय नाही.

माध्यमातील वृत्तानुसार, जडेजाच्या गोलंदाजीत तितकी धार राहिलेली नाही. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत स्थान देण्यामागचं कारण म्हणजे, दुबईतील खेळपट्टी फिरकी गोलंदाजीसाठी फायदेशीर ठरते. यासह तो मोठे फटके खेळण्यासाठी आणि आक्रमक फलंदाजी करण्यासाठी ओळखला जायचा. २०१९ मध्ये झालेल्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेदरम्यान त्याने दमदार फलंदाजी केली होती. पण रोहितप्रमाणेच जडेजा देखील २०२७ वर्ल्डकप सेटअपचा भाग नसल्याची माहिती समोर येत आहे.
जडेजा परफेक्ट ऑलराऊंडर म्हणून ओळखला जायचा. तो गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात मोलाचं योगदान द्यायचा. जर आकडेवारी पाहिली, तर न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या मालिकेत भारतीय संघाला २–१ ने पराभवाचा सामना करावा लागला होता. या मालिकेत तो नावाला साजेशी कामगिरी करु शकला नव्हता. फलंदाजी करताना तो अवघ्या ४३ धावा करु शकला होता. यादरम्यान त्याने अवघ्या १४.३३ च्या सरासरीने धावा केल्या होत्या. जडेजाने २०२४ टी–२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. वनडे आणि टी–२० क्रिकेटमध्ये जडेजाची जागा घेण्यासाठी अक्षर पटेल तयार झाला आहे.

# रोहितचे भवितव्य धोक्यात?



**गेल्या काही काळापासून धावांसाठी झगडत असलेल्या रोहित शर्माचे भारतीय संघातील स्थान धोक्यात आले आहे. इंग्लंडविरुद्ध १९ जुलै रोजी लॉर्ड्सवर होणारा तिसरा एकदिवसीय सामना रोहितचा आंतरराष्ट्रीय कारकीर्दीतील अखेरचा सामना ठरू शकतो.**

**मुंबई :** गेल्या काही काळापासून धावांसाठी झगडत असलेल्या रोहित शर्माचे भारतीय संघातील स्थान धोक्यात आले आहे. इंग्लंडविरुद्ध १९ जुलै रोजी लॉर्ड्सवर होणारा तिसरा एकदिवसीय सामना रोहितचा आंतरराष्ट्रीय कारकीर्दीतील अखेरचा सामना ठरू शकतो. इंग्लंड मालिकेनंतर त्याच्याशिवाय पुढे जाण्याचा 'बीसीसीआय'च्या निवड समितीने निर्णय घेतल्याचे समजते.
सूत्रांच्या माहितीनुसार, निवड समिती यशस्वी जैस्वालसारख्या प्रतिभावान युवा सलामीवीराला संधी देण्यास उत्सुक आहे. तसेच २०२७ एकदिवसीय विश्वचषकात रोहितच्या भूमिकेबाबतही निवड समिती साशंक आहे. अजित आगरकर यांच्या अध्यतेखालील समितीने गेल्या आठवड्यात प्रशिक्षक गौतम गंभीर याच्यासह रोहितशी चर्चा केल्याची माहिती आहे.
''इंग्लंड दौऱ्यानंतरच्या योजनांत रोहितचा समावेश नाही आणि या मालिकेनंतर ते त्याच्याशिवाय पुढे जाण्याचा विचार करत आहेत, असे निवड समितीने रोहितला कळवले आहे. विशेषत: आपल्या तंदुरुस्तीवर काम केल्यानंतर रोहितला खेळणे सुरू ठेवायचे होते. आता निवड समितीने अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी रोहितवरच सोपवली आहे,'' असे 'बीसीसीआय'च्या एका सूत्राने सांगितले.
रोहितने यापूर्वीच ट्वेन्टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.
भारताला विश्वचषक जिंकून दिल्यानंतर काही तासांतच, २९ जून २०२४ रोजी त्याने या प्रारूपाला अलविदा केले. मग मे २०२५ मध्ये त्याने कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्ती जाहीर केली होती. निवड समितीने गेल्या वर्षी रोहितला एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदावरून हटवून त्याच्या जागी शुभमन गिलची नियुक्ती केली होती.
आता निवड समिती त्याच्याबाबत आणखी कठोर निर्णय घेण्याची शक्यता आहे.



# भारताचा इंग्लंडवर दणदणीत विजय

बर्मिंगहॅम–भारत आणि इंग्लंड यांच्यातील सलामीच्या एकदिवसीय सामन्यात भारताने ६ गडी राखून शानदार विजय मिळवला. मात्र, मैदानावरील खेळासोबतच माजी कर्णधार एम.एस. धोनीच्या एका कृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. एडजबॅस्टनच्या स्टँड्समध्ये सामना पाहताना धोनीच्या कानात एक लहान 'इअरपीस' दिसला, जो सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.
धोनीचे मरेडिओ इअरविगफ नेमके काय आहे?
धोनीने घातलेले हे उपकरण मरेडिओ इअरविगफ म्हणून ओळखले जाते. हे प्रामुख्याने क्रीडा प्रेमींसाठी तयार केलेले एक पोर्टेबल ब्रॉडकास्ट रिसीव्हर आहे. याची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:
थेट समालोचन: हे उपकरण स्टेडियममध्ये सुरू असलेल्या सामन्याचे थेट समालोचन कोणत्याही विलंबाशिवाय (अतऊ) कानापर्यंत पोहोचवते.
स्थानिक फ्रिक्वेन्सी: हे स्टेडियम पुरते मर्यादित असलेल्या एका समर्पित रेडिओ फ्रिक्वेन्सीवर कार्य करते, ज्यामुळे मोबाईल नेटवर्क किंवा इंटरनेटवरील विलंबाचा त्रास होत नाही. क्रीडा प्रकारांत वापर: क्रिकेटसोबतच फॉर्म्युला १ आणि घोड्यांच्या शर्यतींमध्ये तज्ज्ञांचे विषण थेट ऐकण्यासाठी हे अत्यंत लोकप्रिय आहे.
मर्यादित रेंज: हे उपकरण केवळ स्टेडियम परिसरातच काम करते. मैदानाबाहेर पडताच याचा सिग्नल मिळणे बंद होते.
सामना पाहताना प्रत्येक बारकावा आणि तज्ज्ञांचे विषण टिपण्याची धोनीची पद्धत आजही त्याच्या खेळाबद्दलच्या गाढ ओढीचे दर्शन घडवते. यादरम्यान धोनीची भेट माजी सहकारी दिनेश कार्तिकशी झाली, ज्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

## किंग कोहलीचे इंग्लंडमध्ये वर्चस्व!

मुंबई–कार्डिफच्या मैदानावर क्रिकेटच्या इतिहासात आणखी एका सुवर्णअध्यायाची भर पडली आहे. भारतीय क्रिकेटचा 'किंग' असलेल्या विराट कोहलीने इंग्लंडच्या भूमीवर असा एक टप्पा गाठला आहे, जो आजवर कोणत्याही भारतीय फलंदाजाला गाठता आलेला नाही. माजी कोच व खेळाडू राहुल द्रविड यांना मागे टाकत विराटने अनोख्या विक्रमाची नोंद आपल्या नावे केली आहे.
इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात जोफ्रा आर्चरच्या गोलंदाजीवर विराट कोहलीने एक शानदार चौकार मारताच, त्याने दिग्गज भारतीय फलंदाज राहुल द्रविड यांच्या नावावर असलेला एक मोठा विक्रम मोडीत काढला. आता इंग्लंडच्या भूमीवर सर्व प्रकारच्या (कसोटी, एकदिवसीय आणि टी–२०) आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज म्हणून कोहलीचं नाव अग्रस्थानी पोहोचलं आहे. या ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचण्यासाठी अनुभवी



फलंदाज विराट कोहलीला सामन्यापूर्वी केवळ ४ धावांची गरज होती. भारताच्या डावातील नवव्या षटकात, जोफ्रा आर्चरने चौथा चेंडू टाकला, विराटच्या बॅटमधून निघालेल्या एका शानदार स्ट्रेट ड्राईव्हने केवळ चेंडू सीमारेषेबाहेरच धाडला नाही, तर इतिहासाच्या पानांवर स्वत:च नाव सर्वोच्च स्थानी कोरलं.
विराट कोहलीने २०११ मध्ये पहिल्यांदा इंग्लंडमध्ये खेळण्यासाठी पोहोचला होता आणि २०१६ पर्यंतचा त्याचा तिथला प्रवास महत्त्वपूर्ण चढ–उतार तसेच संघर्षांनी भरलेला राहिला आहे. त्याने आतापर्यंत इंग्लंडमध्ये एकूण ५९ सामने खेळले असून, ७५ डावांमध्ये २,६४६ङ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याची फलंदाजीची सरासरी ४०.०३ इतकी राहिली आहे.

## फिफा फायनल अर्ध्या तासासाठी थांबवून मनोरंजनाचे कार्यक्रम करणार

दिल्ली–रविवारी स्पेन आणि अर्जेंटिना यांच्यात वर्ल्डकपच्या जेतेपदासाठी मुकाबला रंगणार आहे. जगभरातले चाहते ही लढत पाहण्यासाठी आतूर झाले आहेत. फायनल पाहताना चाहत्यांना हाफ टाईममध्ये अर्धा तास मनोरंजन सांस्कृतिक कार्यक्रम पाहावा लागणार आहे. हा कार्यक्रम झाल्यानंतरच उर्वरित सत्राचा खेळ सुरू होणार आहे. फिफाने यासाठी नियमात बदल केला आहे.फिफाच्या नियमानुसार, हाफटाईम १५ मिनिटांचा असतो. अपवादात्मक परिस्थितीतच यामध्ये बदल होतो. मात्र असंख्य वादांमुळे वादग्रस्त ठरलेल्या यंदाच्या वर्ल्डकपमध्ये भर पडली आहे. सांस्कृतिक मनोरंजनपर कार्यक्रमासाठी अर्धा तास मुक्रर करण्यात आला आहे. या अर्ध्या तासात शकिरा, मॅडोना, के पॉप बँड बीटीएस आणि जस्टीन बिबर अशी मंडळी परफॉर्म करणार आहेत.

## टीम इंडियाकडे मालिका जिंकण्याची सुवर्णसंधी, भारतीय संघात मोठा बदल!

दिल्ली–भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये एकदिवसीय मालिकेच्या दुसऱ्या सामन्याला सुरुवात झाली आहे, या सामन्यात शुभमन गिल खेळणार आहे. भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये झालेल्या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिल याला ८० धावांची खेळी झाल्यानंतर मैदान सोडावे लागले होते. आता टीम इंडियासाठी तो दुसऱ्या सामन्यात पूर्णपणे बरा असल्याचे सांगितले जात आहे. मागील सामन्यात टीम इंडियाचे दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा हे फार काही कमाल केली नाही त्यामुळे आजच्या सामन्यामध्ये ते कशी कामगिरी करणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. आजच्या सामन्याचे नाणेफेक पार पडले आहे, या सामन्यात दोन्ही संघाची प्लेइंग ११ कशी आहे यासंदर्भात सविस्तर वाचा.
भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये सामन्याला सुरुवात झाली आहे या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यात भारताच्या संघाने एक बदल केला आहे तर आता भारताच्या संघाने आजच्या सामन्यामध्ये विजय मिळवला तर टीम इंडिया या मालिकेमध्ये विजय मिळवण्यात दूर राहणार नाही. मागील सामन्यामध्ये वॉशिंग्टन सुंदर आणि अक्षर पटेल यांनी मधल्या फळीतील फलंदाज फेल झाल्यानंतर संघासाठी चांगली कामगिरी केली होती त्यामुळे आजच्या सामन्यात खेळाडूंच्या कामगिरीवर विशेष लक्ष असणार आहे. भारताच्या संघाने प्लेइंग ११ मध्ये मोठा बदल केला आहे, केएल राहुल प्लेइंग ११ मधून वगळण्यात आले आहे आणि त्याच्या जागेवर इशान किशनला भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये खेळवण्याची संधी देण्यात आली आहे.

# वैभव सूर्यवंशीला इंग्लंडमध्ये दबावामुळे संधी मिळाली? गंभीर-आगरकर यांचा वेगळाच होता प्लॅन

**दिल्ली**–इंग्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकेत पदार्पण केल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच, वैभव सूर्यवंशीबाबत एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. या संदर्भात टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांचा उल्लेख एका रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. १५ वर्षीय वैभवने टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरून इतिहास घडवला. पण इंग्लंडविरूद्ध मालिकेत पदार्पणासाठी वैभव सूर्यवंशीचा विचार करण्यात आला नव्हता, पण दबावामुळे त्याला संधी देण्यात आली. इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी–२० सामन्यात वैभव सूर्यवंशीला पदार्पणाची संधी देण्यात आली आणि त्यानंतर त्याने आणखी दोन सामने खेळले. पण या दोन्ही सामन्यात त्याला फारशी महत्त्वपूर्ण कामगिरी करता आली नाही. वैभव सूर्यवंशीला संधी देण्यासाठी अनुभवी फलंदाज संजू सॅमसनला प्लेईंग इलेव्हनमधून वगळण्यात आलं होतं. त्यानंतर पाचव्या टी–२० सामन्यातून वैभवला वगळून पुन्हा संजूला संधी देण्यात आली आहे.
वैभवला संजू सॅमसनच्या जागी प्लेईंग इलेव्हनमध्ये समाविष्ट करण्याच्या निर्णयावर अनेकांनी नाराजी व्यक्त केली. आता एका वृत्तात असा दावा करण्यात आला आहे की, भारतीय संघाला वैभवला खेळवण्यासाठी भाग पाडलं होतं आणि या निर्णयात गौतम गंभीरचा कोणताही सहभाग







नव्हता. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की, जर निवड समितीचे प्रमुख आणि मुख्य प्रशिक्षक वैभवच्या पदार्पणाच्या बाजूने नव्हते, तर मग संघ व्यवस्थापनावर कोणी दबाव टाकला?
वृत्तानुसार, इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत वैभव सूर्यवंशीला खेळवण्यासाठी संघ व्यवस्थापनावर 'अप्रत्यक्ष दबाव' होता. आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी संघात निवड झालेली असूनही, या १५ वर्षीय खेळाडूला पहिल्या सहा सामन्यांत खेळवण्याची कोणतीही योजना नव्हती, असं या वृत्तात म्हटलं आहे. तसंच, पहिल्या सहा सामन्यांत संजू सॅमसनला संधी दिली जाईल, असा निर्णय निवडकर्त्यांनी आधीच घेतला होता, असंही या वृत्तात नमूद केलं आहे.
संजू सॅमसन सुरुवातीच्या सहा सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करू शकला नाही, तरच वैभवला संधी मिळेल, यावर गौतम गंभीर आणि अजित आगरकर यांचंही एकमत होतं. आयर्लंडविरुद्धचे दोन सामने आणि इंग्लंडविरुद्धचा पहिला टी–२० सामना यांत खराब कामगिरी करूनही संजू सॅमसनच दुसऱ्या टी–२० सामन्यात खेळणार हे निश्चित होते; मात्र, अप्रत्यक्ष दबावामुळे वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली. निवड समितीतील एका सूत्राने सांगितल्याचा दावा या रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे की, वैभवला एकदा संधी दिल्यानंतर त्याला अखेरच्या सामन्यातही खेळवायला हवे होते. त्याऐवजी पुन्हा संजू सॅमसनला संघात स्थान देण्याचा निर्णय योग्य नव्हता, असे त्या सूत्राचे मत होते.

## कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) भाडयाने चालविण्यास घेणेसाठी अर्ज करण्याचे ट्वेंन्टीवन शुगर्स चे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** ट्वेंन्टीवन शुगर्स लि. मळवटी या साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२६-२७ साठी कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) भाड्याने चालविण्यास देण्याबाबत निर्णय घेतलेला असुन ऊस तोडणी यंत्र ट्वेंन्टीवन शुगर्स लि. कडे भाडयाने चालविण्यास घेणेसाठी अर्ज करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. या निर्णयामुळे स्थानिक ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांना रोजगाराची व व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होणार आहे.

कारखान्याच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या मालकीचे न्यु हॉलंड-४०१० व शक्तीमान कंपनीचे आधुनिक ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) इच्छुकांना भाड्याने देण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे ऊस तोडणी प्रक्रियेत यांत्रिकीकरणाला चालना देणे आणि शेतकरी व तोडणी वाहतूक कंत्राटदार यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा आहे. विशेषतः सध्या ऊस तोडणी मजुरांच्या कमतरतेमुळे ऊस तोडणीमध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता. हार्वेस्टरच्या वापरामुळे या समस्येवर मोठ्या प्रमाणात पर्याय उपलब्ध होणार असल्याचे कारखाना प्रशासनाने नमूद केले आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेले कंत्राटदार यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज कारखाना कार्यस्थळावरील शेतकी कार्यालयात दिनांक २० जुलै २०२६ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

गाळप हंगाम २०२६-२७ साठी हार्वेस्टर भाड्याने देण्याचा निर्णय हा शेतकरी व कंत्राटदार यांना लाभदायक ठरणार असून, ऊस तोडणी प्रक्रियेला गती देण्यास महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहीतीसाठी संपर्क- श्री. जोगदंड ९६२३०११६१६, श्री. साळुंके ९७०२५०००५५ यांच्याशी करावा.

# शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीज बिल थकबाकी माफ करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्य शासनाने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंत कृषीपंपांचे वीजबील माफ केले आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांच्या नावावर पूर्वीची थकबाकी कायम असल्याने त्यांना नवीन वीज जोडणी घेण्यास अडचणी येत आहेत. यासाठी ४८ हजार कोटी रुपयांचे पूर्वीचे थकीत वीजबील माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिल्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तुलसीहार, विठ्ठल- मूर्ती आणि बैलगाडीची प्रतिकृती भेट देऊन यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सन्मान करण्यात आला. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, आमदार रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, रणधीर सावरकर, संजय कुटे, खासदार अनिल बोंडे तसेच राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली असून या शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करुन वेळेत परतफेड करण्याची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे.

शाश्वत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक

राज्य शासन शाश्वत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. पीक कर्जमाफीसोबतच सिंचन प्रकल्प, जलसंचय, कोल्ड स्टोरेज, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठ जोडणी यासाठी राज्याने हजारो कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पुढील काही वर्षांत या गुंतवणुकीचा प्रत्यक्ष परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर दिसेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. यासोबतच उच्च दर्जाची बियाणे, आधुनिक शेती तंत्रज्ञान, ड्रिप आणि स्प्रिंकलरसारख्या पाणी बचत पद्धती, तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे थेट बाजारपेठेशी जोडणी यासाठी स्वतंत्र योजनांमधून अनुदान दिले जात आहे. देशाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी कृषी क्षेत्रात सतत गुंतवणूक करणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नव्या तंत्रज्ञानाचा गावपातळीवर प्रसार

राज्यातील कृषी विश्वविद्यालये, सहकारी संस्था आणि खासगी क्षेत्र यांच्या भागीदारीतून नव्या तंत्रज्ञानाचा गावपातळीवर प्रसार करून शेती अधिक उत्पादनक्षम आणि नफा देणारी करण्याचे ध्येय राज्य शासनाने ठेवले आहे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किमान दुप्पट वाढ करण्यासाठी आगामी काळात आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुढील पाच-दहा वर्षांत योग्य नियोजन आणि केंद्र-राज्य सरकारच्या संयुक्त गुंतवणुकीतून शेती क्षेत्र स्वतःच्या पायावर उभे राहील असे नियोजन सुरू आहे. शेती क्षेत्रात केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळून यावर्षी ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक विविध योजनांद्वारे करण्यात येत आहे.

नैसर्गिक शेती, जीवामृत यासारख्या प्रयोगांवर भर

शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी इस्रायल फर्टिगेशन आणि पूर्ण ऑटोमेशन असलेले ठिबक सिंचन यासारख्या तंत्रज्ञानाचा आदर्श घेत 'एआय'चा वापर सुरू केला आहे. रासायनिक खतांचा वापर कमी करून जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी नैसर्गिक शेती, जीवामृत यासारख्या प्रयोगांवर भर देण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या माध्यमातून देशी गाईंचे संवर्धन आणि नैसर्गिक शेतीचा प्रसार सुरू आहे. गोमूत्र, शेण, गूळ, हळद इत्यादींच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या जीवामृतसारख्या उपायांनी कमी खर्चात उत्पादन वाढते आहे. अशा अनेक प्रयोगांतून उत्पादन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेती क्षेत्रातही दीर्घकालीन बदल घडवण्याचा शासनाचा मानस आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जलसाठा वाढविण्यात येत आहे.

सातारा-सांगली परिसरात दरवर्षी पूराचे पाणी वाहून जाते. वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून हे पाणी मराठवाड्यात वळविण्याचा प्रयत्न आहे. आपण दुष्काळ पाहिला, परंतु पुढील पिढीला दुष्काळ पाहावा लागणार नाही, असा महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यावेळी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्य शासनाने शेतकरी हितासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे पीक, घरे आणि जनावरे वाहून गेल्यावर आपत्कालीन तातडीने मदत केली आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत ५६ लाखांहून अधिक शेतकरी लाभार्थी ठरले आहेत. सुरुवातीची ३६,५८५ कोटींची कर्जमुक्तीची तरतूद होती आता ती ४०,५८५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख पीककर्ज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, पीएम किसान आणि नमो शेतकरी योजना यांतून शेतकऱ्यांना हजारो कोटींची मदत देण्यात येत आहे महिला शेतकरी सन्मान, एआय धोरण, कृषी समृद्धी आणि पाणंद रस्ता या योजनेसारखे अनेक शेतकरी हिताचे निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# जय क्रांती महाविद्यालयात करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न



प्रमुख पाहुणे डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी विद्यार्थ्यांनी करिअर संसदेच्या माध्यमातून सक्रिय सहभाग नोंदवून स्वतःचा, महाविद्यालयाचा तसेच समाज आणि राष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी सामाजिक भान, लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासत विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

**लातूर/प्रतिनिधी :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर संसदेची स्थापना जयक्रांती महाविद्यालयात करण्यात आली. यानिमित्ताने करिअर संसदेतील नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवप्रसाद डोंगरे , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. सतीश डांगे, डॉ. प्रमोद चव्हाण तसेच डॉ. समीना शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

करिअर कट्टाच्या संकल्पनेतून राज्यभरातील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, सामाजिक उत्तरदायित्व, लोकशाही मूल्ये आणि संघटन कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने करिअर संसद राबविण्यात येते. या संसदेत विद्यार्थ्यांमधून मुख्यमंत्री, विविध विभागांचे मंत्री व इतर पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. त्यांचा शपथविधी राज्यस्तरीय कार्यक्रमातून ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आला. मुंबई येथून प्रसारित झालेल्या या शपथविधीमध्ये जय क्रांती महाविद्यालयातील विद्यार्थीही ऑनलाइन सहभागी झाले. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या शपथविधीप्रमाणेच अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात हा सोहळा पार पडला.

यावेळी विद्यार्थी पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाची शपथ घेत महाविद्यालयातील शिस्त राखणे, व्यसनमुक्त परिसर घडविणे, धूम्रपान व इतर व्यसनांपासून दूर राहणे, पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुणांचा विकास तसेच वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची प्रतिज्ञा केली.

प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी आपल्या मार्गदर्शनात करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता विकास शिबिरे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य विकास, रोजगार व करिअर मार्गदर्शन यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यात येतात, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घेऊन नेतृत्वक्षम, जबाबदार आणि सक्षम नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. अविनाश पवार, प्रा. डॉ. केशव अलगुले, प्रा. डॉ. धीरज कोतमे, डॉ. माया सरवदे, डॉ. गीता वाघमारे,डॉ. समीना शेख, प्रा. सुवर्णा शिंदे, प्रा. कीर्ती रेड्डी, प्रा. शिवराज बाजुळगे, प्रा. अरुण साळुंखे, तसेच श्री. रामदास जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. अविनाश पवार यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य मध्ये करिअर संसद शपथविधी सोहळा उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रज्ञान शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत, करिअर संसद २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षातील करिअर संसदेत निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे अत्यंत उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात महाविद्यालय प्रशासन व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत १५ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात करिअर संसददेतील मुख्यमंत्री, तसेच इतर सर्व मंत्र्यांनी विधीपूर्वक शपथ घेऊन आपल्या पदाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी प्राचार्य प्रोफेसर डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून करिअर संसदेतील सर्व मंत्र्यांना विधीपूर्वक शपथ दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून करिअर कट्टाचे लातूर जिल्हा शहर समन्वयक डॉ.शिवप्रसाद डोंगरे व तसेच करिअर कट्टा लातूर जिल्हा ग्रामीणचे चे समन्वयक डॉ.नरेश पिनमकर हे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने , आयक्यूएसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर, संगणक शाखा विभागप्रमुख डॉ.शशिकांत स्वामी, व्यवस्थापन शाखा विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक करिअर कट्टाचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा.अजय चव्हाण यांनी केले.

करिअर संसदे अंतर्गत विविध पदासाठी शपथ घेतलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

भिसे चेतन कल्याण – मुख्यमंत्री
शुक्ला ऋतुजा संतोष- नियोजन मंत्री
नोगजा जय अनिल- कायदे व शिस्तपालन मंत्री
शिंधाळकर हर्ष दिलीप- सामान्य प्रशासन मंत्री
पवार आदित्य व्यंकट - माहिती व प्रसारण मंत्री
पठाण शफी अताऊल्ला- उद्योजकता विकास मंत्री
शर्मा मानसी प्रशांत- रोजगार स्वयंरोजगार मंत्री
मनियार जकवान सत्तार- कौशल्य विकास मंत्री
हराळ श्रावणी उत्तम- संसदीय कामकाज मंत्री
पांढरे प्रगती बलभीम- महिला व बालकल्याण मंत्री
काळुंके व्यंकटेश बाबासाहेब- सदस्य.
कोमटवाड माऊली नितीन- सदस्य

या सर्व विद्यार्थ्यांनी करिअर संसदेचे पदाधिकारी म्हणून शपथ घेतली. या कार्यक्रमात सर्व पदाधिकारी मंत्री मंडळास नियुक्ती पत्र व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. जिल्हा समन्वयक डॉ.शिवप्रसाद डोंगरे आणि डॉ. नरेश पिनमकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा उपक्रमाविषयी सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात प्रोफेसर प्रशांत मान्नीकर यांनी युवा कौशल्य दिनानिमित्त युवकांच्या कर्तव्याची जाणीव करून देतं करिअर संसद पदाधिकारी विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन करिअर कट्टा समितीतील प्रा.प्रतिभा पोतदार, पाहुण्यांच्या परिचय प्रा. क्षितीज कांबळे यांनी तर आभार प्रा.ऋषिकेश डोंगरे यांना मानले. समितीतील प्रा.ज्योती महावरकर, प्रा . सिद्दिका पटेल तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. या शपथविधी समारंभासाठी डॉ. कविता बियाणी, डॉ. बालाजी कळंबे प्रा.अक्षय पवार,प्रा. प्रतीक्षा आगलावे, प्रा.सुपर्णा देशपांडे यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मराविमं अधिकारी संघटनेच्या लातूर परिमंडळाच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड

## अध्यक्षपदी देविदास सुरवसे तर सचिवपदी अजित जैन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड ऑफिसर्स असोसिएशनच्या लातूर परिमंडळाची सन २०२६-२७ या कार्यकाळासाठी नवीन कार्यकारिणीची निवड उत्साहात पार पडली. या निवडणुकीत सर्व पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीनुसार अध्यक्षपदी श्री देविदास सुरवसे यांची निवड झाली असून उपाध्यक्षपदी श्री संतोष सांगोळे (बीड) व श्री मनोज पेटकर (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे. कार्याध्यक्षपदी श्री आनंद गंजी, सचिवपदी श्री अजित जैन (लातूर), तर सहसचिवपदी श्री सतीश जावळेकर (लातूर), श्री महेश चव्हाण (धाराशिव) आणि श्री शरद गदळे (बीड) यांची निवड झाली. याशिवाय कोषाध्यक्षपदी श्री गजानन लवराळे (लातूर), महिला प्रतिनिधी म्हणून सौ. सविता पवार (बीड), प्रसिद्धीप्रमुखपदी श्री धनंजय पवार (लातूर), विधी सल्लागार म्हणून ङ चेडे , तसेच सल्लागार म्हणून श्री चेतन वाघ (लातूर) आणि श्री जालिंदर मंगळवेढेकर (लातूर) यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज सहाय्यक महाव्यवस्थापक श्री चेतन वाघ व वरिष्ठ व्यवस्थापक श्री जालींदर मंगळवेढेकर तसेच उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री महेंद्र चुनारकर यांनी पाहिले.



पदभार स्विकारताच सचिव अजित जैन म्हणाले की, वित्त व लेखा, मानव संसाधन, माहिती व तंत्रज्ञान, औद्योगिक संबंध, जनसंपर्क, विधी, सुरक्षा व अंमलबजावणी आदी विभागातील अधिकाऱ्यांचे ही संघटना प्रतिनिधित्व करते. तिन्ही वीज कंपन्यांतील अधिकाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन कार्यकारिणी अधिक जोमाने प्रयत्न करेल. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांचे हीत लक्षात घेवून नूतन कार्यकारिणी प्रशासनास सर्वोतोपरी मदत करेल. नूतन अध्यक्ष श्री देविदास सुरवसे यांनीही सत्काराला ङत्तर देताना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तसेच संघटनेला अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी ही कार्यकारिणी प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला.

नवीन कार्यकारिणीवर अधिकारी वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# राष्ट्र उभारणीत युवकांनी पुढाकार घ्यावा : नायब तहसीलदार गोकुळ भराडिया




कळंब (प्रतिनिधी)- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूर, महाविद्यालयातील एनसीसी विभाग आणि विद्या भवन हायस्कूल, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १५) एनसीसी स्थापना दिवस व जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण महर्षी ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहोकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून नायब तहसीलदार गोकुळ भराडिया उपस्थित होते. त्यांनी राष्ट्र उभारणीत एनसीसीची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करत युवकांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव श्री. वाघ यांनी कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व विशद केले. बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी कौशल्यविकासावर भर देऊन राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. संजय कांबळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत भगवान यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संयोजन एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. के. डब्ल्यू. पावडे आणि थर्ड ऑफिसर आप्पासाहेब वाघमोडे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. दत्ता साकोळे यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे अधीक्षक अरविंद शिंदे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच एनसीसी कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रबंधक हनुमंत जाधव यांनी सहकार्य केले.

# केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत मोठा घोळ? शिक्षण विभागात स्वच्छ कारभाराची गरज

धाराशिव(रामेश्वर डोंगरे)- शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याच्या आरोपांनी पुन्हा एकदा प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. २०१८ पासून रखडलेली पदोन्नती प्रक्रिया आजही पूर्णत्वास न गेल्याने अनेक पात्र शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमबाह्य पद्धतीने कागदपत्रांची पडताळणी, ज्येष्ठतेचा गोंधळ, सेवापुस्तकातील त्रुटी, अपूर्ण अभिलेख आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे. शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे की, पात्र उमेदवारांना डावलून काहींना लाभ मिळावा यासाठी नियमांची मनमानी व्याख्या करण्यात आली. सेवाज्येष्ठता, आरक्षण, पात्रता आणि शासनाच्या निकषांचा योग्य विचार झाला का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक शिक्षकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करूनही त्यांची दखल घेतली गेली नसल्याची तक्रार आहे. विशेष म्हणजे, काही प्रकरणांमध्ये कागदपत्रे गायब झाल्याचा, तर काही ठिकाणी नोंदीत फेरफार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. २०१८ पासून रखडलेली प्रक्रिया पूर्ण का झाली नाही? पात्र शिक्षकांना न्याय मिळणार की नाही? कागदपत्रे गायब होण्यामागे जबाबदार कोण? शिक्षण विभाग पारदर्शक चौकशी करणार का? दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? शिक्षण विभाग हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. अशा विभागात जर पदोन्नती प्रक्रियेतच संशय, विलंब आणि अनियमिततेचे आरोप होत असतील, तर त्याचा थेट परिणाम संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे शासनाने या प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी सर्वसामान्य नागरिक आणि शिक्षकांची अपेक्षा आहे. शिक्षणात राजकारण नव्हे, तर पारदर्शकता हवी. पात्रतेचा सन्मान आणि भ्रष्टाचारावर प्रहार हीच खरी शिक्षण व्यवस्थेची ओळख ठरली पाहिजे. अन्यथा विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या व्यवस्थेला जनता कधीच माफ करणार नाही.

# हरिनामासह गण गण गणात बोतेचा जयघोष, पालखीच्या दर्शनासाठी भाविकांची दुतर्फा गर्दी




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-श्री विठ्ठलाच्या ओढीने पावसाळ्यातही उन्हाच्या झळा सोसत शेगावीचा राणा श्री गजानज महाराजांचा पालखी सोहळा मजल-दरमजल करत पंढरीकडे निघाला. येथून २१ जून रोजी पंढरीकडे निघालेली पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले. मुखी हरिनाम, हातात भागवत धर्माची पताका, टाळ-मृदंगाच्या तालावर टिपेला पोहोचलेले अभंगाचे बोल... अन् गण गण गणात बोते अशा जयघोषात शिस्तबद्ध निघालेला पालखी सोहळा २५ व्या दिवशी बुधवारी (दि. १५) सकाळी पावणे आठ वाजता धाराशिव शहरात प्रवेशित झाला. आकर्षक रांगोळी त्यावर सुगंधित फुलांच्या पायघड्या घालून पुष्प वर्षावाने धाराशिवकरांनी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौकात भक्तिमय वातावरणात स्वागत केले. स्वागतगातासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी गर्दी केली होती. पालखी नऊ वाजता ज्ञानेश्वर मंदिर परिसरात दाखल झाली.

चिमुकल्यांनी केलेली वारकऱ्यांची वेशभूषा अशा वातावरणाने धाराशिवमध्ये पंढरी अवतरली होती. पालखी राजर्षी शाहू महाराज चौकातून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पोलिस अधीक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौक, देशपांडे स्टँड, नेहरू चौक, माऊली चौकी, डाक कार्यालयामार्गे लेडीज क्लब मैदानावर मुक्कामासाठी पोहोचली. दिंडीतील वारकऱ्यांचे जिल्हा प्रशासन, व पोलिस दलाकडून स्वागत करण्यात आले. बुधवारी दुपारी पोलिस विभागातील मोटर परिवहन विभागाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वखर्चाने केळी व पाणी बॉटल वाटप केल्या. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सेवाभावी संस्था, पक्षांचे कार्यकर्ते, संघटनांच्या वतीने ठिकठिकाणी चहा, नाष्टा, पाण्याची सोय करण्यात आली होती. तसेच व्यापारी व भाविक भक्तांकडून बिस्किट, लाडू, पेढे व फराळ वाटप करण्यात येत होता. गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत शेगावची प्रसिद्ध असलेल्या कचोरीच्या गाड्याही येतात. वर्षातून एकदाच वेगळ्या चवीची कचोरी खायला मिळत असल्याने खवय्यांची कचोरीच्या गाड्यांवर गर्दी झाली होती.

पायी वारीची ५७ वर्षांची परंपरा, ७०० वारकरी विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे संत गजानन महाराज यांचे भव्य मंदिर आहे. मागील ५७ वर्षांपासून शेगाव येथून पालखी पंढरपूरकडे पायी जाते. यावर्षी वारीत ७०० वारकऱ्यांचा समावेश आहे.

# कळंब उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न लवकर मार्गी लावू:संयुक्त बैठक घेण्याचे पालकमंत्र्यांचे आश्वासन



कळंब(प्रतिनिधी)- शहरातील उपजिल्हा रुग्णालयाला १०० खाटांची मंजुरी मिळाल्यानंतर विस्तारासाठी आवश्यक जागेचा प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेऊन रुग्णालय विस्ताराचा विषय मांडला. या वेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक लवकरच घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले.

कळंब शहरात १९९२ च्या सुमारास ग्रामीण रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या इमारतीतच आजही उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार सुरू आहे. शहराचा विस्तार आणि ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन २ जानेवारी २०१७ रोजी या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देत ५० खाटांची मान्यता दिली. त्यानंतर २८ फेब्रुवारी २०२५ रोजी रुग्णालयाची क्षमता वाढवून १०० खाटांना मंजुरी दिली.

मात्र, खाटांची संख्या वाढली असली तरी त्यानुसार आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. आजही जुन्याच इमारतीत रुग्णालय सुरू असल्याने रुग्णांवर उपचार करताना जागेची कमतरता, विविध विभागांसाठी अपुरी व्यवस्था आणि रुग्ण तसेच नातेवाइकांची गैरसोय अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, नव्या इमारतीसाठी शहरापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावरील जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव पुढे आला होता. मात्र रुग्णालय शहराबाहेर गेल्यास सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय होईल. या कारणामुळे या प्रस्तावाला तीव्र विरोध केला. पिंगळे यांनी पालकमंत्री सरनाईक यांची मुंबईत भेट घेतली तेव्हा पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्याधिकारी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन करून प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.

आरक्षित ६० आर जागा केव्हा मिळणार आहे ? कळंब शहराच्या सन २०२२ च्या सुधारित शहर विकास आराखड्यात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. यामध्ये पूर्वीचे जलतरण तलाव आणि क्रीडांगणाचे आरक्षण रद्द करून त्याच ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयाच्या विस्तारासाठी ६० आर जागा आरक्षित करण्यात आली आहे. सदरील जागा उपजिल्हा रुग्णालयास हस्तांतरित कधी होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**
**9284321472**

# भाजी मंडई आरक्षित जागेवरील बांधकामाला पालिकेने बजावली नोटीस:७ दिवसांत खुलासा करण्याचे तुळजापूर सीईओंचे निर्देश



तुळजापूर (प्रतिनिधी)-शहरातील जवाहर गल्ली येथील सिटी सर्व्हे क्र. ९७२ मधील भाजी मंडईसाठी आरक्षित जागेवरील बांधकाम थांबविण्याची नोटीस नगरपालिकेने बजावल्याने खळबळ उडाली आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी संबंधितांना नोटीस बजावत सात दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी सिटी सर्व्हे क्र. ९७२ मधील भाजी मंडईसाठी आरक्षित जागा नगरपालिकेने ताब्यात घ्यावी, अशी मागणी केली होती. संबंधित जागेचे भूसंपादन होऊन ती नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आली असतानाही मूळ मालकास बांधकाम परवानगी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला होता. या जागेवर व्यापारी संकुल व लॉजिंगचे बांधकाम करण्यात आल्याचे सांगत संबंधित अधिकारी व नगर अभियंत्यांनी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करता बांधकाम परवानगी दिल्याचा आरोपही करण्यात आला होता. या मागणीसाठी पांढरे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेसमोर आंदोलन करण्यात आले होते. तसेच नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतही भाजी मंडई आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आला होता.

या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने बांधकाम थांबविण्याचे निर्देश दिले असून, विहित मुदतीत खुलासा न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नोटीसमध्ये देण्यात आला आहे.

वीरशैव समाजाच्या जंगम मठाच्या वतीने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन या प्रकरणात चुकीची माहिती पसरविली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जंगम मठाच्या निवेदनानुसार, सिटी सर्व्हे क्र. ९७२ ही जागा हैदराबाद इंडोमेंट रेग्युलेशन ॲक्ट १३४९ फसलीनुसार नोंदणीकृत धार्मिक संस्थेची आहे. शासनाने १९६२ मध्ये या जागेसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली जंगम मठ ट्रस्ट स्थापन केला होता. या जागेतील ७३१ चौ.मी. क्षेत्रावर नगरपरिषदेने भाजी मंडईसाठी आरक्षण टाकले होते. त्यास ट्रस्टच्या वतीने १९७० ते १९७६ दरम्यान शासनाकडे पत्रव्यवहार करून विरोध करण्यात आला होता. नगरपालिकेच्या आरक्षण व भूसंपादन प्रक्रियेला शासनाच्या नगरविकास विभागाने १९७६, १९७८ आणि १९८३ मध्ये स्थगिती दिल्याचा दावा जंगम मठाच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच १९९७ नंतर नगरपरिषदेने विविध ठरावांद्वारे आरक्षण वगळण्याची प्रक्रिया केली असून सुधारित विकास आराखड्यात सदर जागा जंगम मठाकडे कायम ठेवण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जंगम मठाच्या वतीने या जागेवर महादेव मंदिर, सभामंडप व धर्मशाळा उभारण्याचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच सोशल मीडिया व माध्यमांमधून चुकीची माहिती पसरवून अपप्रचार केला जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

# ४५,००० किंमतीची तांब्याची तार अज्ञाताने चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतगृत दि२५ ०.०६.२०२६ रोजी महाजन्को व भेल कंपनी प्रा.लि. कौडगाव येथील आयआर -१ आयआर २ लोकेशन पी ३ एरीया मध्ये सौर उर्जा पॅनला जोडलेला ४ स्वेअर मि मि ची १७४ तांब्याची तार १३ कि.मी.असे एकुण ४५,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी सागर मोहन येलगुंटवार, वय ३७ वर्षे, रा. मोंढा ता. हिंगना जि. नागपुर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649